सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २४ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५७ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

आयपीएलमध्ये विजयासह हैदराबादची सुरुवात

मुंबई: इंडियन प्रीमियर लीग २०२५मधील दुसऱ्या सामन्यात सनरायजर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात टक्कर झाली. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये रंगलेल्या सामन्यात हैदराबादने ४४ धावांनी विजय मिळवला. राजस्थान रॉयल्सला विजयासाठी २८७ धावांचे आव्हान मिळाले होते याचा पाठलाग करताना त्यांना ६ बाद २४२ धावा करता आल्या.

मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या राजस्थान रॉयल्सची सुरूवात खराब राहिली. त्यांनी दुसऱ्याच ओव्हरमध्ये दोन विकेट गमावल्या. वेगवान गोलंदाज सिमरजीत सिंहने पहिल्यांदा यशस्वी जायसवालला बाद केले. त्यानंतर कर्णधार रियान परागही स्वस्तात बाद झाला. त्यानंतर मोहम्मद शमीने नितीश

राणाला बाद केले. यामुळे राजस्थानचा स्कोर तीन विकेटवर ५० होता. संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेलने मिळून डाव सांभाळला. दोघांनी १११ धावांची भागीदारी केली. या पार्टनरशिपला हर्षल पटेलने तोडले, त्याला संजू सॅमसनने बाद केले.

संजू सॅमसनने ३७ बॉलवर ६६ धावा केल्या. यात सात चौकार आणि चार षटकारांचा समावेश आहे. त्यानंतर स्पिनर एडम झाम्पाने जुरेलची इनिंग्स संपवली. जुरेलने २००च्या स्ट्राईक रेटने ७० धावा केल्या.

सनरायजर्स हैदराबादने केला दुसरा स्कोर, इशान किशनचे शतक

सामन्यात सनरायजर्स हैदराबादने टॉस हरल्यानंतर पहिल्यांदा बॅटिंग करताना ६ बाद २८६ धावा केल्या. हा आयपीएलच्या इतिहासातील एखाद्या संघाचा दुसरा मोठा स्कोर होता. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठा स्कोर सनरायर्स हैदराबादनेही बनवला आहे. इशानने ४६ बॉलमध्ये नाबाद १०६ धावा केल्या. या दरम्यान इशान किशनने ११ चौकार आणि ६ षटकार ठोकला आहे.

नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी मेळा प्राधिकरणाची स्थापना करणार

नाशिक : महाराष्ट्रात नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या कुंभमेळ्यासाठी सरकारी पातळीवर तयारी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री गिरीश महाजन आणि मंत्री दादा भुसे यांनी नाशिक जिल्ह्याचा दौरा केला. सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यासाठी मेळा प्राधिकरणाची स्थापना करणार असल्याचे जाहीर केले.

विकासकामांसाठी पुरेसा निधी दिला जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

उत्तरप्रदेशच्या धर्तीवर महाकुंभसाठी कायदा केला जाईल. गोदावरी प्रदुषणमुक्तीसाठी पुढील महिन्यांपासून काम सुरू होईल. नाशिकप्रमाणे त्र्यंबकेश्वरचाही विकास केला जाईल. उत्तर प्रदेश येथे महाकुंभसाठी कायदा तयार करण्यात आला, आपणही तसाच कायदा करणार आहोत; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कुंभमेळ्यासाठी नाशिक जिल्ह्यात ११ पूल तयार करण्याचा निर्णय झाला आहे. नवीन घाट बनवण्यात येतील. एसटीपीचे जाळे तयार करून पाणी शुद्धीकरणाचे काम केले जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोणत्याही प्राधिकरणात साधू महंत नाहीत. प्रशासकीय कामांमध्ये सरकारी अधिकारी त्यांची जबाबदारी पार पाडतील.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना ओव्हरटाइमचे पैसे मी देईन - डोनाल्ड ट्रम्प

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नासा अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना ओव्हरटाइम पगार देण्याची घोषणा केली. हे दोघेही ८ दिवसांच्या मोहिमेसाठी अवकाशात गेले होते. परंतु तांत्रिक बिघाडामुळे त्यांना अवकाशात ९ महिने अडकून पडावे लागले होते.एलॉन मस्क यांच्या अंतराळयानाच्या मदतीने १९ मार्चला त्यांना सुखरुप परत आणण्यात आले.त्यांना मोहिमेत २७८ दिवसांचा ओव्हरटाइम करावा लागला होता.याचे पैसे आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प देणार आहेत.

ओव्हल ऑफिसमध्ये ट्रम्प यांनी शनिवारी(दि.२२)प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी ट्रम्प यांना अंतराळात अडकून पडावे लागल्याने सुनीता विल्यम्स व बुच विल्मोर यांना काही वाढीव वेतन दिले जाणार आहे का, असे प्रश्न विचारले असता त्यावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, याबद्दल कोणीही माझ्याशी कधीच बोलले नाही. गरज पडल्यास मी माझ्या खिशातून पैसे देईन. त्यांना जे सहन करावे लागले त्याच्यापेक्षा ते जास्त नाही. तसेच नासाच्या अंतराळवीरांना परत आणल्याबद्दल ट्रम्प यांनी एलन मस्क यांचे आभार मानले. ते म्हणाले की जर आपल्याकडे मस्क नसते, तर अंतराळवीर बराच काळ तिथे अडकले असते.

अंतराळवीरांच्या प्रवास, राहण्याचा आणि जेवणाचा खर्च नासा उचलते. याशिवाय, ते छोट्या दैनंदिन खर्चासाठी अतिरिक्त ५ डॉलर्स (४३० रुपये) देखील देते. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचे वेतन अनुक्रमे ९४,९९८ (रु. ८१,६९,८६१) आणि १२३,१५२ (रु. १,०५,९१,११५) आहे. याशिवाय, त्यांना अंतराळात घालवलेल्या एकूण २८६ दिवसांसाठी १,४३० (रु. १,२२,९८०) मिळतील.

न्यायाधीशांच्या घरी सापडलेल्या नोटांच्या घबाडाचा व्हिडिओ आला समोर!

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या शासकीय निवासस्थानी होळीच्या दिवशी आग लागल्याची घटना घडली होती. यादरम्यान आग विझविण्यासाठी अग्निशामक दल आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले असता त्यांच्या घरातील एका खोलीत नोटांचा ढिगारा आढळून आला होता. या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली असून सदर प्रकरण भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना समजल्यानंतर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. दरम्यान, सुर्पीम कोर्टाने न्यायाधीशांच्या घरी सापडलेल्या जळक्या घबाडाचा व्हिडिओ शेअर केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुप्रीम कोर्टानं नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम रहावा म्हणून आणि पारदर्शकता राखण्यासाठी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी लागलेल्या आगीत जळालेल्या नोटांच्या प्रकरणातील सर्व कागदपत्रे सोशल मीडियावर पोस्ट केली आहेत. काल रात्रीच्या सुमारास सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटवर जळक्या नोटांचा व्हिडिओ शेअर केला आहे. सुप्रीम कोर्टाच्या इतिहासात हे पहिल्यांदा घडलं आहे की एखाद्या न्यायमूर्तींच्या विरोधातील आरोपांच्या चौकशीसाठीची सर्व कागदपत्रं सार्वजनिक करण्यात आली.

दरम्यान, सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी दिल्ली हायकोर्टाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी सापडलेल्या नोटांच्या चौकशीसाठी समिती स्थापन केली आहे. तीन न्यायमूर्तींची समिती स्थापन करण्यात आली असून या प्रकरणी न्या. यशवंत वर्मा यांची चौकशी होईल. नवी दिल्ली हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानंतर सुप्रीम कोर्टानं हा निर्णय घेतला आहे.

कामापासून दूर राहण्याचे आदेश

सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी दिल्ली हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय यांना न्यायमुर्ती यशवंत वर्मा यांना न्यायदानाच्या कामापासून दूर राहण्याचे आदेश दिले आहेत. सुप्रीम कोर्टानं या संदर्भातील एक प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. सरन्यायाधीशांनी या प्रकरणी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. या समितीत पंजाब आणि हरियाणा हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, हिमाचल हायकोर्टाचे मुख्य न्यायधीश जी. एस. संधावालिया आणि कर्नाटक हायकोर्टाचे न्यायाधीश अनू शिवरमन यांचा समावेश आहे.

राजीनाम्याची मागणी

हायकोर्टाच्या जजच्या घरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम सापडल्याने न्यायपालिकेत खळबळ उडाली आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वात वर्मा यांची बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर काही न्यायमूर्तींनी त्यांच्या चीही मागणी केली आहे.

मनसेच्या मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी संदीप देशपांडे यांच्याकडे

मुंबई : राजकीय वर्तुळातून महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज ठाकरे यांनी आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज (दि २३) रवींद्र नाट्यमंदिरात मनसेची बैठक घेतली. यावेळी राज ठाकरे यांनी मनसेतील नवीन पदे आणि पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. त्यानुसार फक्त विभाग अध्यक्ष असलेल्या मनसेत आता शहर अध्यक्ष आणि उप-शहर अध्यक्ष या नव्या पदांची निर्मिती करण्यात आली आहे. पक्षाच्या मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी संदीप देशपांडे यांना देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षसंघटनेत मोठे फेरबदल करण्याचे संकेत दिले होते. पक्षात कोणती पदे असतील, त्याची पुनर्रचना कशी असेल, पदाधिकाऱ्यांच्या आचारसंहितेत कोणते मुद्दे असावेत, याचा अभ्यास करून मागील काही दिवसांपासून राज ठाकरे हे स्वत: याबाबतचा आराखडा तयार करत होते. त्यानुसार आज मनसेच्या प्रमुख नेत्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत केंद्रीय समिती स्थापन करण्यासह महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने मुंबईत पक्षाला बळकटी देण्यासाठी काय करायला हवं, याबाबत विचारमंथन करण्यात आले. संदीप देशपांडे यांना पक्षाच्या मुंबई शहराध्यक्षपदाची तर मनसे नेते बाळा नांदगावकर यांच्यावर गट अध्यक्षांच्या कामाचा आणि राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यावर मनसेच्या शाखा अध्यक्षांच्या कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी देण्यात आल्याचे समजते. याशिवाय, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अविनाश अभ्यंकर यांच्यासह आणखी काही नेत्यांना मनसेच्या केंद्रीय समितीत स्थान देण्यात आले आहे.

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये दहा ते पंधरा पर्यटकांना आग्या मोहळाचा चावा

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २३ . जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये रविवारी पाच वाजता आग्या मोहळाचा पर्यटकांवर हल्ला जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये रविवारी पाच वाजता लेणी नंबर दहा येथे आग्या मोहळाचे पाच ते सात पोळ असुन पुरातत्व विभागाने याकडे दुर्लक्ष केले असून मागील महिन्यात दहा जणांना या आग्या मोहळानी चावा घेतला असता तरी पुरातत्व विभागाने याकडे दुर्लक्ष करून या आग्या मोहळाची विल्हेवाट लावली नाही.

यामुळे रविवारी देशी विदेशी पर्यटक यांना या मोहळानी चावा घेतला तरी या पर्यटकांची नावं कळाले नाही कारण की येथे मोठ्या प्रमाणात पळापळ झाली आणि पर्यटक आपल्या गाड्या पकडून दवाखाना गाठले असे कळाले याविषयी पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही त्यामुळे आता प्रतिक्षा आहे की अजून हे आग्या मोहळ किती जणांना चावा घेणार की त्यांचा बंदोबस्त पुरातत्व विभाग घेणार याकडे पर्यटकांचं लक्ष आहे.

ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय सहाय्यक पल्लवी सरोदे यांचे अपघाती निधन

ठाणे : ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या स्वीय सहाय्यक या पदावर कार्यरत असणाऱ्या पल्लवी सरोदे (वय ३७ वर्ष) यांचे रविवार २३ मार्च रोजी सकाळी हरिहरेश्वर समुद्र किनाऱ्यावर अपघाती निधन झाले. कार्यालयीन मैत्रिणींसह त्या हरिहरेश्वर या ठिकाणी सहली निमित्त गेल्या होत्या. तेथील समुद्रकिनारी त्या लाटेत अचानक ओढल्या गेल्या, त्यात त्यांचा मृत्यू झाला. पल्लवी सरोदे या ठाणे जिल्हा प्रशासनात २०१२ रोजी लिपिक या पदावर रुजू झाल्या होत्या. मार्च २०२४ मध्ये त्यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदावर पदोन्नती मिळाली होती. त्या सध्या जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या. पल्लवी सरोदे यांच्या पश्चात त्यांचे पती, सासू - सासरे आणि मुलगा असा परिवार आहे.

पाणी जपून वापरण्याचे आयुक्त डांगे यांचे आवाहन

२२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त संजीवनी कॉलनीत 'जल' जागृती कार्यक्र

अ.नगर : संपूर्ण सजीव सृष्टीसाठी पाण्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. निसर्गाचे हे अनमोल वरदान सध्या मोफत असले तरी भविष्यात पाण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. पृथ्वीवरील शुद्ध पाण्याची सध्या असलेली उपलब्धता लक्षात घेता प्रत्येकाने पाणी जपून व काटकसरीने वापरणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

२२ मार्च जागतिक जल दिनाच्या निमित्ताने ग्रीन कॉलनी संजीवनी कॉलनीमध्ये हरिभुमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित जलजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आयुक्त डांगे बोलत होते.

घरगुती गार्डन पाईपला प्रेशर नोझल / जेट जोडल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत

होऊ शकते, याचे प्रात्यक्षिक हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी यावेळी आयुक्त डांगे यांच्यासमोर करून दाखवले. याचबरोबर हे गार्डन पाईप प्रेशर नोझल / जेट कॉलनीतील सदस्यांना जागतिक जलदिनानिमित्त वितरित करण्यात आले.

यावेळी पाणी बचती संदर्भात मार्गदर्शन करताना आयुक्त श्री डांगे म्हणाले की, नागरिकांनी महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून उपलब्ध होणारे पाणी पेयजल काटकसरीने वापरावे, वाहने धुतांना, अंगणामध्ये सडा मारताना होणारा पेयजलाचा अपव्यय टाळावा, नादुरुस्त जलवाहिन्या दुरुस्त करून घेणे, गळके / टीपकणारे नळ दुरुस्त करून घेणे, पिण्यासाठी पेल्यात आवश्यक तेवढेच पाणी घ्यावे, एक-दोन दिवसापूर्वीचे पिण्याचे पाणी टाकून न देता त्याचा इतर वापर करावा, वॉश बेसिनचा नळ गरजेपुरता वापरावा, धुण्याचे पाणी झाडांसाठी वापरण्याचे नियोजन करावे आदी साध्या सोप्या उपाययोजना करून पाण्याचा अपव्यय सहज टाळता येऊ शकतो असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. यावेळी कॉलनीतील जेष्ठ सदस्य शांतीलाल गुगळे, सुरेश चांडक, विनय बिनायके, सुनील जोशी,

यांनी प्रधानमंत्री सूर्य घर योजनेअंतर्गत घराच्या छतावर सोलर पॅनल युनिट बसविण्याचा संकल्प केला. तर सुमित चांडक यांनी घराच्या छतावरील पाण्याचे संवर्धन (रूफ वॉटर हार्वेस्टिंग) करण्यासाठी यंत्रणा बसविण्याचा निर्धार केला. यावेळी प्रशांत मते, चंद्रकांत शिपणकर, अभय ललवाणी, पारस चुडीवाल, सलिम शेख, यश गुगळे, आशिष बळे आदी उपस्थित होते.

जुन्या वाहनांसाठी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ

अहिल्यानगर, दि. २१ - राज्यातील जुन्या वाहनधारकांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत ३० जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार, १ एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या सर्व नवीन वाहनांसाठी एचएसआरपी पाटी बंधनकारक आहे. तसेच, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठीही ही नंबर प्लेट बसवणे अनिवार्य आहे. यासाठी शासनाने पूर्वी ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत दिली होती. मात्र वाहनधारकांचा प्रतिसाद अपेक्षेइतका नसल्याने ती वाढवून ३० जून २०२५ करण्यात आली आहे.

एचएसआरपी नंबरप्लेटसाठी अर्ज मोटार वाहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://transport.maharashtra.gov.in) करता येईल. तसेच, वाहनधारकांच्या अडचणी सोडवण्यासाठी परिवहन विभागाने सहायता कक्ष सुरू केला आहे. विहित मुदतीत एचएसआरपी नंबरप्लेट बसवले नाही, तर नियमभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असेही श्री. सगरे यांनी कळविले आहे.

अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार, शविच्छेदनानंतर दहन; अज्ञात वाहनधारका विरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा,

गंगापूर दि.२३: छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर महामार्गावर भेंडाळा शिवारात अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला असून अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला असून अज्ञात आरोपी वाहन धारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की,परिक्षेत्र वैजापुर (प्रा.) अंतर्गत मौजे भेंडाळा शिवार येथून छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर महामार्गावर दिनांक २२ रोजी रात्री जाणा-या अज्ञात वाहणाणे वन्यप्राणी नर बिबट्या अनुसूची (१) मधिल वय सातवर्ष यास जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून पलायन केले आहे. ज्यात वन्यप्राणी बिबट्या

घटनास्थळी ठार झाला.याघटनेचा पंचनामा करून वन्यप्राणी बिबटयाचे शवविच्छेदन व दहन कायदेशिर रित्या पूर्ण करुन भारतीय वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ चे कलम ३९ नुसार अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सदर कामाची कार्यवाही पी. शी.लाकरा वनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर, श्रीमती सुवर्णा माने उपवनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीप संकपाळ सहायक वनसंरक्षक रोहयो व कॅम्प कन्नड श्रीमती पि. बि. भिसे वनपरिक्षेत्र अधिकारी वैजापुर प्रा. , अनिल पाटील वनपरिमंडळ अधिकारी पाराळा , एन. आर चापे वनरक्षक वरझडी, पशुधन विकास अधिकारी श्रेणी १ शेंदुरवादा व तुर्काबाद तसेच पशुधन पर्यवेक्षक वाडगाव व डोणगाव यांनी पुर्ण केली तसेच श्रीमती पि बि भिसे वनपरिक्षेत्र अधिकारी वैजापुर (प्रा.) यांनीनागरिकास आवाहन केले की, नागरिकांनी वाहणाच्या वेगावर मर्यादा ठेवल्यास वन्यप्राणी जखमी अथवा मृत्युमुखी पडण्याच्या घटना घडणार नाही. अशी माहिती श्रीमती पि.बि.भिसे वनपरिक्षेत्र अधिकारी वैजापुर (प्रा.) यांनी दिली.

नागपूरमधून संचारबंदी हटवली

नागपूर : नागपूर पोलिसांनी रविवार २३ मार्च २०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यापासून कोतवाली, गणेशपेठ, यशोधरानगर आणि तहसीलसह सर्व संचारबंदी असलेल्या भागांमधून संचारबंदी हटवली आहे. याआधी १७ मार्च रोजी शहरात उसळलेल्या हिंसाचारानंतर नागपूरचे पोलीस आयुक्त रविंद्र सिंगल यांनी संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १० पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. आता परिस्थिती नियंत्रणात आल्याने आणि शांतता प्रस्थापित झाल्याने संपूर्ण शहर संचारबंदी मुक्त झाले आहे.

संचारबंदीच्या काळात संबंधित भागांतील सर्व दुकानं, बाजारपेठा, शाळा आणि व्यावसायिक आस्थापनांना बंद ठेवले होते. सततच्या बंदमुळे सामान्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर परिस्थिती नियंत्रणात आल्यावर पोलिसांनी संचारबंदी हटवली आहे. यामुळे नारिकांना दिलासा मिळाला आहे.

याआधी संचारबंदीच्या काळात परिस्थिती थोडी नियंत्रणात आल्यावर गणेशपेठ, कोतवाली आणि तहसील भागात नागरिकांना सकाळी ७ ते १० या वेळेत आवश्यक वस्तू खरेदीसाठी सवलत देण्यात आली होती. मात्र, यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी कायम होती. नागरिकांना घराबाहेर पडण्यास बंदी होती. रविवारी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नागपूर पोलिसांनी संपूर्ण शहरातून संचारबंदी हटवली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता ठेवावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागपुरातील हिंसाचार प्रकरणात आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली असून, त्यापैकी ९२ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित १२ अल्पवयीन आरोपींवर कायद्यानुसार कारवाई सुरू आहे. बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि इतरांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांवरही कारवाई सुरू आहे. दंगल करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांकडूनच दंड रुपाने वसुली करुन सरकार हानीची भरपाई करणार आहे. ज्यांची दंड देण्याची ऐपत नाही अशा आरोपींची मालमत्ता विकून त्यांच्याकडून दंड वसूल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

एमजीएममध्ये 'विकसित भारत युवा संसद' स्पर्धा यशस्वीपणे संपन्न

विकसित भारत युवा संसद राज्यस्तरीय स्पर्धेसाठी १० विद्यार्थ्यांची निवड

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेयर्स अँड स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विकसित भारत युवा संसदेचे एमजीएम विद्यापीठात यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रथम १० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.ह.नि.सोनकांबळे, प्रा.डॉ.अमरदीप असोलकर, प्रा.आशुतोष पाटील,जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे आणि जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला यांनी काम पाहिले.

देशाच्या भविष्यावर प्रभाव टाकणाऱ्या राष्ट्रीय प्रश्नांवर तरुणांना मते मांडण्याची संधी मिळावी आणि त्यांची नेतृत्व क्षमता विकसित व्हावी, यासाठी 'विकसित भारत युवा संसद २०२५' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १८ ते २५ वर्षे वयोगटातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धेत एकूण १५० विद्यार्थ्यांमधून ५० विद्यार्थ्यांनी 'वन नेशन, वन इलेक्शन' या विषयावर आपले विचार मांडले. यातील गुणांकणासह प्रथम येणाऱ्या १० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :

१. सांज बाबासाहेब घुगे, २. नूपुर नागर, ३. दिशा रमेश सोलापुरे, ४. प्रथमेश सतिश चाटे, ५. प्रतीक्षा पांडुरंग अंभोरे, ६. तितिक्षा प्रदीप वाघ, ७. साद जलील,८. भावना विजय मोगळ , ९. श्रेया धनंजय मुळ्ये, १०. गौरी कुलकर्णी

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.आर.आर.देशमुख, प्रा.आरती साळुंके, बालाजी शेळके, प्रकाश त्रिभुवन व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले.

एमजी कॉमेट ईव्ही २०२५ अधिक सोयीसुविधा आणि आरामादायी अनुभवसह सादर

पुणे : भारतातील स्मार्ट रस्त्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या स्टायलिश कारला नव्या रूपात सादर करताना जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडिया ने नाविन्यपूर्ण एमजी कॉमेट ईव्ही २०२५ची घोषणा केली आहे. आकर्षक गुणवैशिष्ट्य आणि प्रगत तंत्रज्ञानासह सुसज्ज ही कार ४.९९ लाख रुपयांच्या प्रारंभिक किमतीत उपलब्ध आहे. यासोबतच बॅटरी-ॲज-अ-सर्व्हिससह रुपये २.५ प्रति किलोमीटर दराने बॅटरी सुविधा मिळणार आहे.

जनरल झेड चीफ गेमिंग ऑफिसर पदासाठी १० लाख देणार

नवी दिल्ली, : आइकू, एक उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड, २०२५ साठी त्यांच्या चीफ गेमिंग ऑफिसर शोधत आहे, जो स्मार्टफोन स्पेसची सह-निर्मिती करण्यासाठी, ब्रँडच्या ईस्पोर्ट्स व्हिजनचे नेतृत्व करण्यासाठी आणि भारतातील शीर्ष ईस्पोर्ट्स गेमर्सशी सक्रियपणे सहभागी होण्यासाठी जबाबदार असेल. ही संधी १८ ते २५ वयोगटातील तरुण गेमिंग उत्साहींना त्यांच्या आवडीचे यशस्वी आणि फायदेशीर करिअरमध्ये रूपांतर करण्याची संधी देते. चीफ गेमिंग ऑफिसर ला आइकू मधील नवीनतम उत्पादनांची उपलब्धता असेल आणि जगभरातील प्रमुख गेमिंग इव्हेंटमध्ये ब्रँडचे प्रतिनिधित्व करेल.

जाहीर प्रगटन

मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. काटकर मॅडम) क. स्तर यांचे कोर्टात

दि. किरकोळ अर्ज क. १६२/२०२५

अर्जदार : १. झुंबराबाई भ्र. फकीरचंद राजपुत वय-८५ धंदा शेती, रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद २. मंगला भ्र.नारायण राजपुत वय-४३ धंदा- शेती रा. मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. राहुल पि. नारायणसिंग राजपुत वय-२६ धंदा- शेती रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. रणजित पि. नारायण राजपुत वय-२४ धंदा- शेती रा. मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. रेणुका पि. नारायण राजपुत वय-२३ धंदा-शेती रा. मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. - औरंगाबाद ६. कांताबाई भ्र. कैलास राजपुत वय-४१ धंदा शेती रा. मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ७. रवि पि.कैलास राजपुत वय-१९ धंदा शिक्षण रा. मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ८. पोर्णिमा पि.कैलास राजपुत वय-१४ धंदा- शिक्षण रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद तर्फे अ.पा.क. म्हणुन अर्जदार क. ६ कांताबाई भ्र. कैलास राजपुत जनक आई ९. निर्मलाबाई भ्र. संतोषसिंग कुठंबरे वय ४५ धंदा घरकाम रा. मु.बोरगांव वाडी ता. जाफ्राबाद जि. जालना १० नंदा भ्र. पवन कायटे वय ३५ धंदा घरकाम रा. - मु. पो. भिलदरी (पि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्द:-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ६ चे सासरे व अर्जदार क. २ ते ५ व ७,८ यांचे आजोबा व अर्जदार क. ९ व १० यांचे वडील मयत नामे फकिरचंद पि.बाळाराम राजपुत यांचा मृत्यु दि. २६/०४/२०१३ रोजी मौजे तलाववाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते १० हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत फकिरचंद पि. बाळाराम राजपुत यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत फकिरचंद पि.बाळाराम राजपुत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०५/०३/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

जाहीर प्रगटन

मा. व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६३/२०२५

पुढील तारीख १६/०४/२०२५

अर्जदार : १. नूर खान कलीम खान पठाण, वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. शिव नगर कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. मोईन खान कलीम खान पठाण, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. अंधानेर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रेहानाबी युनूस शेख, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधानेर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. शमिमबानो निझामअली सय्यद, वय ६९ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्नेह नगर कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद.

विषय : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरिल ठिकाणचे रहिवासी असुन ते सर्व मयत कलीमुल्लाखों मनवरखॉ पठाण यांचे कायदेशिर वारस आहेत. मयत कलीमुल्लाखॉ मनवरखॉ पठाण हे अर्जदार क्र. ०१ ते ०४ हे यांचे वडील होते. या व्यतिरिक्त मयत कलीमुल्लाखॉ मनवरखॉ पठाण यांना कोणतेही कायदेशिर वारस नाहीत. मयत कलीमुल्लाखों मनवरखॉ पठाण यांचे दिनांक १८/०३/१९७९ रोजी मौजे अंधानेर, ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे निधन झालेले असुन त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय अंधानेर, ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झालेली आहे. मयत कलीमुल्लाखॉ मनवरखॉ पठाण यांची पत्नी सदाबी कलीमुल्ला पठाण ह्यांचे देखील दिनांक १९/०१/१९९४ रोजी निधन झालेले आहे ज्या अर्जदार यांच्या आई होत्या. मयत कलीमुल्लाखाँ मनवरखॉ पठाण यांच्या नांवावर मौजे अंधानेर, ता. कन्नड जि. औरंगाबाद हद्दीत नगर भूमापन क्रमांक ५४२ ज्याचे क्षेत्रफल ४५.६० चौ.मी असे आहे हि मिळकत आहे. सदर मिळकतीच्या महसुल अभिलेखी अर्जदारांनी त्यांची नावे लावण्यासाठी संबंधीत कार्यालयात तोडी विनंती केली असता संबंधीत अधिकाऱ्याने त्यांना मा. न्यायालयाच्या वारस प्रमाणपत्राची तोंडी मागणी केली आहे. करिता अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज मा न्यायालयात दाखल करण्यास कारण घडले आहे. अशा प्रकारे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदारांनी मा. न्यायालया व्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयात अन्य कायद्याखाली अर्ज केला नाही किंवा प्रलंबित नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०३/२०२५.

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (वि.द. पाटील), (क. स्तर) कन्नड यांचे न्यायालयात

सिव्हील एम.ए. नं. १२७/२०२५ — पु.ता. २८/०४/२०२५

अर्जदार : १) श्री. कैलास पिता दत्तात्रय जाधव, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. माळीवाडा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर. २) श्री. बाळू पिता दत्तात्रय जाधव, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३) श्रीमती, विमलबाई भ्र. दत्तात्रय जाधव, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर.

प्रकरण : सक्सेशन सर्टिफिकेट / उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

असे की, ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी ॲड. पी. आर. जाधव, रा. छत्रपती संभाजीनगर, यांचे मार्फत सक्सेशन सर्टिफिकेट / उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचे पती नामे दत्तात्रय पिता सोनाजी उर्फ सोनाबा जाधव, हे दि. २५/०३/२०२४ रोजी मौजे माळीवाडा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, येथे निधन झालेले आहे. तसेच मयत नामे दत्तात्रय पिता सोनाजी उर्फ सोनाबा जाधव, यांचे आई वडीलांचे देखील यापुर्वीच निधन झालेले आहे. मयत नामे दत्तात्रय पिता सोनाजी उर्फ सोनाबा जाधव, यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

असे की, मयत नामे दत्तात्रय पिता सोनाजी उर्फ सोनाबा जाधव, यांच्या नावे त्यांचे खाते असलेल्या बैंक म्हणजेच दि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक लि., औरंगाबाद, शाखा कन्नड, ता. कन्नड, येथील बँक/बचत खाते क्र. (२२०४४) ००४०११००२०००६०२, या मध्ये रक्कम रुपये १६,८१४.५१.०० (अक्षरी सोळा हजार आठशे चौदा रुपये एक्कावन पैसे), श्री अग्रसेन को-ऑप. बँक लि. बाजार पेठ, कन्नड, शाखा कन्नड, बैंक/बचत खाते क्र.२३/३३७७, या मध्ये रक्कम रुपये १,२२,८१३/- (अक्षरी एक लाख बावीस हजार आठशे शहान्व रुपये), महाराष्ट्र ग्रामीण बैंक, शाखा कन्नड, बैंक/बचत खाते क्र.८००१४४२८७९६, या मध्ये रक्कम रुपये २४,०००/- (अक्षरी दोन हजार चारशे रुपये), जयप्रकाश नागरी सह. पतसंस्था मर्या., कन्नड, शाखा कन्नड, बैंक/बचत खाते क्र. १९०६, या मध्ये रक्कम रुपये १५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रुपये) या मधील रक्कम व त्यावरील व्याज घेण्याकरीता तसेच बुलढाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसा. म. बुलढाणा, शाखा कन्नड, बैंक/बचत खाते क्र.५९८८, हे खाते बंद करण्यासाठी संबंधीत बँकेतील कर्मचारी यांनी अर्जदार यांना मा. न्यायालयातून सक्सेशन सर्टिफिकेट /उत्तराधिकारी प्रमाणपत्राची मागणी केली, म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल करण्याचे कारण घडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांच्या नावे सक्सेशन सर्टिफिकेट / उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच दि.१८/०४/२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. मुद्द्ीत कोणाचाही काही उजर/आक्षेप न आल्यास अर्जदार क्र. १ च्या नावे सक्सेशन सर्टिफिकेट /उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करीता दि. १०/३/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

आदेशावरून

क. लिपिक — सहा. अधिक्षक

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर कन्नड.

जाहीर प्रगटन

मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (ए. आय. अवटी) यांच्या कोर्टात.

दिवाणी अर्ज क्र-७१/२०२५

अर्जदार : १. नासेरखा पिता महम्मद सिददीकी पठाण, वय- ५३ वर्षे, धंदा-व्यापार, रा. शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. अमेरखान पिता महम्मद सिददीकी पठाण, वय ४० वर्षे, धंदा-व्यापार, रा. शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. ऊमरखॉ पिता महम्मद सिददीकी पठाण, वय ३७ वर्षे, धंदा-व्यापार, रा. शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. जाकीरखा पिता महम्मद सिददीकी पठाण, वय ४४ वर्षे, धंदा-व्यापार, रा. शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. शहनाजबी भ्र. अहेमदखा, वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. सुलतानबी शेख खाज्या, वय ७९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गणोरी ता. फुलंब्री जि. औरंगाबाद. ७. मुमताजबी भ्र. लतीफखान, वय- ५४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. शेफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ८. श्रीमती मुख्तारबेगम भ्र. महम्मद सिददीकी उर्फे पाषाखान, वय ८४ वर्षे, धंदा- शफेपुर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे कायेदशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ८ यांनी ॲड. एन. बि. थोरात व बि. डी. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत महम्मद सिददीकी मुनीराददीन उर्फे पाषा पठाण हे मौजे शेफेपुर पिशोर येथील मुळचे राहणारे असुन ते मुळ पुरुष होते. ते दि.२२.०९.२०२० रोजी मौजे शफेपुर पिशोर ता. कन्नड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ व ४ हे मयत महम्मद सिददीकी मुनीराददीन उर्फे पाषा पठाण यांचे मुले असुन अर्जदार क्र. ५ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहे. अर्जदार क्र. ८ हि मयताची विधवा पत्नी आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस मयतास नाही. महम्मद सिददीकी मुनीराददीन उर्फे पाषा पठाण हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात वारस म्हणुन अर्जदार यांना शासकीय कामे करण्यासाठी, ग्रापं. कार्यालय तसेच तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, जिल्हाअधिकारी कार्यालय औरंगाबाद, तसेच ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ८ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक. १७/३/२०२५

प्रकरणात पुढील तारीखः- ११.४.२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

जाहीर प्रगटन

मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्रीमती ए. आय. अवटी) यांच्या कोर्टात.

दिवाणी किरकोळ अर्ज क्र- १५२ /२०२५

अर्जदार : १. पंढरीनाथ पिता त्रिंबक बोडखे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. देभेगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद २. दादासाहेब पिता त्रिंबक बोडखे, वय ४३ वर्षे, धंदा - शेती, रा. देभेगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे - जिल्हा अधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी ॲड.एन.बि. थोरात कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत त्रिंकब पिता शंकर बोडखे हे अर्जदार नं. १ व २ यांचे वडील आहे मयत त्रिंकब पिता शंकर बोडखे हे दिनांक ०८.१०.२०२४ रोजी मौजे देभेगांव ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मयत त्रिंकब पिता शंकर बोडखे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. त्रिंकब पिता शंकर बोडखे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत देभेगांव तहसील कार्यालय व महसुल दप्तरी ईतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. व तशी मागणी अर्जात केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ व २ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब्हे जाहीर प्रगटन

दिनांक : १९/२०२५

प्रकरणात पुढील तारीखः- १६.०४.२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

जाहीर प्रगटन

मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९९/२०२५ — पुढील तारीख ३०/०४/२०२५

अर्जदार : १- देवमन पि. विठ्ठल सोनवणे वय- ४८ वर्षे, धंदा- शेती, रा. निंभोरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद २-प्रभाकर पि. विठ्ठल सोनवणे वय- ४२ वर्षे, धंदा- शेती, रा. निंभोरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३-सौ. संगीता भ्र. सुरेश घुगे वय ४६ वर्षे धंदा घरकाम रा. रोहीणी ता. चाळीसगांव जि. जळगांव

विरुध्द

गैरअजदार : महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवाशी असुन अर्जदार क्रं. १ ते ३ हे आपसात बहीण भाऊ आहेत. अर्जदार क्रं. १ ते ३ चे वडील नामे विठ्ठल पिता गरिबराव सोनवणे हे दि. ०८/०३/२०२० रोजी मौजे निंभोरा येथे मरण पावलेले आहेत. तसेच अर्जदार क्रं. १ ते ३ ची आई नामे नादराबाई भ्र. विठ्ठल सोनवणे हया सुध्दा दि.१२/०५/२०२१ रोजी मौजे निंभोरा येथे मरण पावलेल्या आहेत. सोबत मृत्यु प्रमाणपत्र जोडलेले आहे. मयत विठ्ठल पिता गरिबराव सोनवणे यांना अर्जदारां शिवाय इतर कोणीही वारसदार नसुन अर्जदार हे मयतांचे कायदेशिर वारस आहेत.

अर्जदार यांना शासकिय व निमशासकिश कामे करण्यासाठी ग्रामपंचायत निंभोरा ता. कन्नड व तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, काम करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ३ चे हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असुन ते त्यांना मिळणे जरुरी आहे. अर्जदारांनी ग्रामपंचायत निंभोरा येथे वारस प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी नकार देवुन मा. कोर्टाचा आदेश घेवुन या असे तोंडी सांगीतल्याने अर्जास कारण दिनांक ०७/०३/२०२५ रोजी घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक २०/०३/२०२५

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

जाहीर प्रगटन

मा. ए. आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.

दि.कि.अर्ज क्र. १४०/२०२५ — पुढील तारीख- १६/०४/२०२५

अर्जदार : १. ब्रम्हदेव मांगू जाधव, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. अंकुश मांगू जाधव, वय-५८ वर्षे, धंदा-शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. लहू मांगू जाधव, वय-५८ वर्षे, धंदा शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४.१ चंद्रकला नामदेव जाधव, वय-६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४.२ किशोर नामदेव जाधव, वय-४२ वर्षे, धंदा- नोकरी, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४.३ संदीप नामदेव जाधव, वय-३५ वर्षे, धंदा शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४.४ प्रदीप नामदेव जाधव, वय-३४ वर्षे, धंदा- शेती, रा. गव्हाली तांडा, ता. कन्नड, जि.औरंगाबाद. ४.५ वैशाली शिवाजी चव्हाण, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्वामी पार्क, नेह नगर दिंडोरी, ता.जि. नाशिक. ४.६ सुनिता कृष्णा चव्हाण, वय-३६ वर्षे, धंदा घरकाम रा. वडनेर तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४.७ सुरेखा दादाभाऊ राठोड, वय-३२ वर्षे, धंदा शेती, रा.लोह शिंगवे, ता. जि. नाशिक. ५. यशोधा त्रिंबक राठोड, वय-६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. महादेव मंदिर जवळ, प्लॉट नं. ४-९-१-१७५, भानुदास नगर बिग बझार मागे ता. जि. औरंगाबाद. ६. राधा रामराव राठोड, वय-५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा वाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ७. सावित्रीबाई रुमदेव राठोड, वय-५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गुदमा तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ८. लताबाई देवचंद राठोड, वय-५० वर्षे, धंदा घरकाम, रा.प्लॉट नं. १२ तोरणागड हौसिंग सोसायटी, नाशिक रोड, पडेगाव, ता.जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ.संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सदर केला कि, हे की, अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत मांगू बाळा जाधव व मयत ठगनाबाई मांगू जाधव यांचे मुले होती व आहेत. मयत मांगू बाळा जाधव व मयत ठगनाबाई मांगू जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ८ हे कायदेशीर वारस आहे. मयत मांगू बाळा जाधव दिनांक २६/०८/२००६ रोजी मौजे गव्हाली तांडा ता. कन्नड येथे मरण पावले असून व मयताची पत्नी ठगनाबाई मांगू जाधव हि सुद्धा दि.२१/०६ /२०१० रोजी मौजे गव्हाली तांडा, ता. कन्नड येथे मयत झालेली आहे. मयत मांगू बाळा जाधव व मयत ठगनाबाई मांगू जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ४ हे मुले आहेत व अर्जदार क्र. ५ ते ८ ह्या विवाहित मुली आहेत. अशी एकूण मयतास अर्जदार क्र. १ ते ८ अशी एकूण ८ आपत्य होती. त्यापैकी अर्जदार क्र. ४ नामदेव मांगू जाधव हे मयत झाले असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयतांचा मुलगा नामदेव मांगू जाधव हा दि. ०५/०७/२०२१ रोजी शासकीय रुग्णालय औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. त्यांना अर्जदार क्र. ४.१ ही पत्री असून अर्जदार क्र. ४.२ व ४.४ हे मुले आहेत व अर्जदार क्र.४.५ ते ४.७ या विवाहित मुली आहेत व्यतिरिक्त म

महिला आणि युवकांसाठी उद्योजकता आणि आर्थिक साक्षरतेला चालना

छत्रपती संभाजीनगर : ॲमेझॉन इंडियाने एन्त्रेप्रेंयूर्शिप फॉर अनेबलमेंट या तीन वर्षांच्या कार्यक्रमाची घोषणा केली असून त्याचा उद्देश ३०,००० महिला आणि युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याबाबत तसेच त्यांच्या आर्थिक विषयक गोष्टींचे व्यवस्थापन करण्याबाबत शिक्षित करणे आहे. हा कार्यक्रम शाश्वत जीवनशैलीसाठी नाविन्यपूर्ण कल्पना राबविण्यावर भर देत जगण्यासाठी बळ देण्याचे काम करणारी संस्था ॲक्सेस डेव्हलपमेंट सर्व्हिसेस यांच्यासोबत भागीदारीत राबवला जाणार आहे. ॲमेझॉनद्वारे सहनिर्मित आणि वित्तपुरवठा केला जाणारा हा उपक्रम हरियाणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये राबवला जाणार आहे. २० मार्च २०२५ रोजी गुरुग्राम येथे झालेल्या प्रारंभ सोहळ्यात विकास विभाग, गुरुग्राम, भारतीय रिझर्व्ह बँक, नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट आणि ग्रामीण विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था यांसारख्या महत्त्वाच्या सहयोगी संस्थांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत उद्योजकांच्या विकासातील संधी आणि आव्हानांवर चर्चा झाली.

सेन्सोडाईन नेस्थापन केला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' २०२५ वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियान सुरु करणार

मुंबई : हेलेऑन (पूर्वीची ग्लॅक्सोस्मिथक्लाईनकन्झ्युमर हेल्थकेअर) यांचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रँड असलेल्या सेन्सोडाईनने २४ तासांत सर्वाधिक ऑनलाइन डेन्टल स्क्रीनिंग टेस्ट पूर्ण करण्याचाप्रयत्न करून यशस्वीरित्या एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' स्थापन केला आहे. हाविक्रमी उपक्रम महा कुंभ २०२५ येथे राबविण्यात आला. या उपक्रमात २७,००० पेक्षाजास्त लोकांनी दातांची तपासणी करवून घेतली. भारतीयांना सक्रिय मौखिक देखभालीचे महत्त्व समजावूनदेण्याच्या बाबतीतील हे एक लक्षणीय पाऊल ठरले. या व्यतिरिक्त, आपल्या निष्ठेला अनुसरून सेन्सोडाईन ने आपल्या अलीकडेच लॉन्च झालेल्या २० रु.च्या छोट्या टुथपेस्ट पॅक्सचे वितरण केले. दातांच्या संवेदनशीलतेपासून संरक्षणमिळवणे अधिक किफायतशीर आणि सहजप्राप्य बनवण्यासाठी खास तयार केलेले हे पॅक आहेत.

'स्प्लिट्झ बाय एव्हरीडे'ने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी केली भागीदारी

मुंबई : 'स्प्लिट्झ बाय एव्हरीडे' या भारतातील एका आघाडीच्या मॉड्युलर किचन क्सेसरीज ब्रँडने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) या एका सर्वात लोकप्रिय आयपीएल टीमसोबत भागीदारी केली आहे. एव्हरीडेच्या स्प्लिट्झने आयपीएल २०२५ हंगामासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबत मॉड्युलर किचन क्सेसरीज भागीदार म्हणून यशस्वी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रसंगी एव्हरीडेच्या स्प्लिट्झचे विक्री व विपणन संचालक आणि मुख्य वित्त अधिकारी निर्मल परेश लुनागरिया म्हणाले, आगामी आयपीएल २०२५ हंगामासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबत भागीदारी करण्याचा आम्हाला आनंद होत आहे.

वि.मा.मिरासदार यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर : वि.मा.मिरासदार (९१ वय)यांचे दोन दिवसांपूर्वी त्यांच्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. वि.मा.मिरसदार हे पंढरपुरातील आपटे हायस्कूलचे माजी सचिव व मुख्याध्यापक होते.वि.मा.मिरासदार हे माझे भाऊ सतिश कोर्टीकर यांचे सासरे होते.वि.मा. मिरासदार यांचे नंतर काही वर्षांनी त्यांची कन्या सौ.रोहिणी सतिश कोर्टीकर ही देखील आपटेहायस्कूलची मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होती. सुप्रसिद्ध थोर साहित्यिक द.मा.मिरासदार यांचे बंधू होते. रा.स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक असणारे वि.मा.मिरासदार हे पंढरपूरातील आपटे हायस्कूलचे माजी सचिव व मुख्याध्यापक होते.

निर्मलाबाई सुरवाडे यांचे निधन

सोयगाव,दि.२३ मार्च : तालुक्यातील गलवाडा(अ)येथील रहिवाशी निर्मलाबाई सोनुलाल सुरवाडे (वय.६०) यांचे रविवारी रोजी दुपारी २:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ५:३० वा.गलवाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात,पती,तिन मुले,एक मुलगी,सुना,नांतु,नातवंडे,असा परिवार आहे.त्या सोयगाव होमगार्ड पथकातील प्रशांत सुरवाडे,रवींद्र सुरवाडे यांच्या मातोश्री होत.

जाहीर प्रगटन

मा. व्ही. एन. काटकर साहेब, दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.

दिवाणी. किरकोळ. अर्ज. क्र. १५९/२०२५.

पुढील तारीख १५/०४/२०२५

अर्जदार : १. खातूनबी भ्र. भिकनखॉ पठाण, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. वौदवी भ्र. अब्दुल रेहमान पठाण, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. सुग्राबी भ्र. निजाम खान, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. शांती नगर, भिवंडी ता. भिवंडी जि. ठाणे, ४. लतीफ पिता भिकनखॉ पठाण, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. कुंजखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. मुकिमखाँ भिकनखाँ पठाण, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. कुंजखेडा ता. कत्रड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद अर्जदार क्र. १ ही मयत भिकनखों जहागिरखॉ पठाण यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ ह्या मयत भिकनखों जहागिरखॉ पठाण यांचे विवाहित मुली असून अर्जदार क्र. ४ व ५ हे मुले आहेत. अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत भिकनखों जहागिरखों पठाण यांचे कायदेशीर वारस असून यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील नामे भिकनखाँ जहागिरखॉ पठाण हे मौजे कन्नड ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत भिकनखों जहागिरखॉ पठाण हे दि.२६/०८/२०२३ रोजी कन्नड येथे वृद्धपकाळाने मरण पावले आहे. तसेच अर्जदार क्र. १ चे दिर व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे काका मयत उस्मानखों जहागिरखॉ पठाण हे सुद्धा दि.१५/०२/२००२ रोजी मौजे कुंजखेडा येथे मयत झालेले आहे. मयत उस्मानखों जहागिरखॉ पठाण याचे लग्न झालेले नसल्यामुळे त्यांना अर्जदार क्र. १ ते ५ शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत भिकनखों जहागिरखॉ पठाण व उस्मानखों जहागिरखॉ पठाण यांचे मृत्यु पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय. तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण आवश्यकता आहे. मयत भिकनखों जहागिरखॉ पठाण व उस्मानखों जहागिरखॉ पठाण हे मौजे कुंजखेडा, ता. कन्नड येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतांना अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वाग्स प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक. ०३/०२/२०२५ रोजी मौजे कुंजखेडा, ता. कब्रड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनाक : १७/०२/२०२५.

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

रामकृष्ण मिशन आश्रमच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी औषधी वाटप

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ :- पैठण यात्रेत गेल्या अठरा वर्षा पासुन सातत्य पुर्ण रित्या राबविण्यात येत असलेल्या सेवाभावी आरोग्य तपासणी शिबिराचे यंदा ही नाथषष्ठी निमित्ताने आयोजन करण्यात आले आहे याचे उद्घाटन रामकृष्ण आश्रमचे स्वामी रामव्रताआनंद व विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय पा.शिसोदे यांचे यांचे हस्ते करण्यात आले या शिबिरामधे महात्मा गांधी मिशन ,हेडगेवार रुग्णालय संभाजीनगर व चिखली,शेगाव चे तज्ञ डॉक्टर्स यांनी रुग्णांची तपासणी करत आहेत. या शिबिरात रुग्णांना लगेच मोफत औषधे दिली जातात ,या शिबिरात जेष्ठ वारकरी मोठ्या प्रमाणात तपासणी करतात ,पायी चालल्याने व उन्हामुळे त्यांना होणारा त्रास कमी होण्यास मदत होते .या शिबिरात ओआरएस पेय याचे ही वाटप होते.

हे शिबिर तीन दिवस चालणार आहे.पहिल्या दिवसांत नऊशे पेक्षा जास्त पेशंट ची नोंद झाली होती. या मधे जेष्ठ डॉक्टर रामदास अंबुलगेकर डॉ.सुभाष शहा.डॉ संतोषबोरुळ डॉ सुभाष कुर्हाळे चिखली ,हेडगेवार हॉस्पिटलचे डॉ. जनार्धन घुगे,डॉ विक्रांत क्षिरसागर डॉ.प्रणव भावसार एमजीएम छत्रपती संभाजीनगर यांचे सह मोफत औषधी साठी सहकार्य करणारे भारत झोडपे,डॉ. निखिल जाधव,अभिजीत सूर्यवंशी,रविंद्र पाटील सतिश प्रभु,अण्णा शेवाळे,अशोक बारबोठे आदिनी सहकार्य केले आहे .तीन दिवसात सरासरी तीन हजारा पेक्षा जास्त वरकायांची आरोग्य तपासणी करण्यात येते

या शिबिरास आमदार विलास बापु भुमरे,दुध संघ संचालक,नंदलाल काळे,माजी सभापती नंदकुमार पठाडे,माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे,राजेंद्र औटे,संदीप काळेआदींनी भेट दिली शिबिराच्या यशस्वी ते साठी श्री नाथ हायस्कूल चे प्राचार्य शिवाजी पठाडे, मुख्याध्यापक संतोष खरात,पवन खरात,प्रा.संतोष गव्हाणे,सुनील चितळे,अजित धस,प्रा.प्रवीण गोर्डे ,पंढरीनाथ फुलझळके, लबडे,कापसे,राजु सोनवणे,आदि कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

वेस्टर्न डिजिटलने डब्ल्यूडी ब्लू एसएन५००० एनवीएमई एसएसडी सादर केली

पुणे- प्रिमियम कंटेंटच्या वाढत्या मागणीसाठी, कंटेंट क्रिएटर्स आणि प्रोफेशनल्सना मोठ्या प्रमाणात स्टोरेज क्षमतेची गरज असते, जी वेगवान आणि अधिक कार्यक्षम वर्कफ्लोसाठी उपयुक्त असते. तसेच, एआई-सक्षम ॲप्लिकेशन्स मोठ्या प्रमाणात मीडिया फायली निर्माण करत असल्याने, उच्च कार्यक्षमता आणि जास्त क्षमतेच्या डेटा स्टोरेजची गरज वाढत आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, वेस्टर्न डिजिटलने अलीकडेच नवीन डब्ल्यूडी ब्लूएॅ एसएन५००० एनवीएमई' एसएसडी' एसएसडी लाँच केली आहे. ही नेक्स्ट-जनरेशन स्टोरेज विशेषतः कंटेंट क्रिएटर्स आणि प्रोफेशनल्ससाठी तयार करण्यात आली आहे, ज्यांना मल्टी-स्ट्रीम ४केव्हिडिओ, इमेजेस आणि ऑडिओ यांसारख्या उच्च कार्यक्षमतेच्या वर्कफ्लोची आवश्यकता असते.

जाहीर प्रगटन

मा. व्ही. एन. काटकर साहेब, दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.

दि. किरकोळ. अर्ज. कं. १७७/२०२५,

पुढील तारीख २२/०४/२०२५.

अर्जदार : सलीम कालू शहा, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. हसनखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. श्री कृष्णा नगर, शिर्डी, ता. राहता जि. अहमदनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदाराचे वडील कालू शाह मलंग शाह रा. हसनखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर हे दिनांक ०९/०७/१९९४ रोजी गावी हसनखेडा ता. कन्नड येथे मयत झाले आहे. अर्जदाराची आई व मयत कालू शाह मलंग शाह याची धर्मपत्नी फातेमाबी भ्र. कालू शाह हि सुद्धा मरण पावलेली आहे. अर्जदार यास मयत कालू शाह मलंग शाह यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हा मयताचा वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत कालू शाह मलंग शाह हे मौजे हसनखेडा, ता. कन्नड येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार हा एकमेव वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक ०२/०१/२०२५ रोजी मौजे हसनखेडा ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक :-१७/०३/२०२५.

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

मा. श्री. ए. आय. आवटी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कत्रड यांचे न्यायालयातून

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ११०/२०२५

पुढील नारीख : १५/०३/२०२५

अर्जदार : १ मच्छिंद्र माणिकराव भोसले वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वडाळी, ता. कब्रड, जिल्हा छ. संभाजीनगर, २- संभाजी माणिकराव भोसले वय ७९ वर्षे, धंदा शेती, रा. वडाळी, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ३- राजेंद्र माणिकराव भोसले वय ५४ वर्षे, धंदा पोलिस, रा. तोरणागड हाऊसिंग सोसायटी प्लॉट नं. २० पडेगांव, ता.व जिल्हा संभाजीनगर ४- छाया भाऊसाहेब मोहिते वय ५७ वर्षे, धंदा घरकाम रा. भाऊसाहेब, हाऊस नं. ९८, नयाब कॉलनी, दष्मेश नगर, हुजर भोपाल ५- शिला अशोकराव जाधव वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. धोत्रा, ता. चिखली, जिल्हा बुलढाणा ६- शिलाबाई दिपक जाधव वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. करवंड ता. चिखली, जिल्हा बुलढाणा

- विरुध्द -

गैरअर्जदार : १- महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर २- कृष्णा माणिकराव भोसले, रा. वडाळी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद । मयत । १- तेजस कृष्णा भोसले वय २५ धंदा शिक्षण रा. वडाळी ता. कन्नड जि. औरंगाबाद २- आदेश कृष्णा भोसले वय २३ धंदा शिक्षण रा. वडाळी ता. कन्नड जि. औरंगाबाद ३- कल्पना कृष्णा भोसले वय ३७ धंदा घरकाम रा. वडाळी ता. कन्नड जि. औरंगाबाद

अर्जः अर्जदार १ ते ६ हे मयत प्रमीलाबाई माणिकराव भोसले यांचे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी.एफ. म्हस्के, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ ते ६ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवाशी आहेत, अर्जदार क्रमांक १ ते ३ मुले व अर्जदार क्रमांक ४ ते ६ मुली नामे प्रमीलाबाई माणिकराव भोसले यांना अर्जदार १ ते ६ व्यतीरिकत कोणीही वारस नाही. अर्जदार क्रमांक १ ते ३ मुले असून अर्जदार क्रमांक ४ ते ६ मुली आहेत. मयत प्रमीलाबाई माणिकराव भोसले अर्जदार क्रं. १ ते ६ यांची आई हे दिनांक ९.८.२०१५ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्य संस्कार हा वडाळी येथे करण्यात आलेला आहे. मयत प्रमीलाबाई माणिकराव भोसले यांना अर्जदारां शिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाही. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. तसेच मयताच्या नावे असलेल्या प्रकल्पग्रस्त योजनेचा फायदा घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची गरज आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सब्ब आज दिनांक १५.०३.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : १५.०३.२०२७

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. काटकर मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात

दि. किरकोळ अर्ज क. १६२/२०२५

अर्जदार १. झुंबराबाई भ्र. फकीरचंद राजपुत वय-८५ धंदा शेती, रा-मृतलाववाडी पो करंजखेडा (ज) ता-कन्नड जि औरंगाबाद २. मंगला भ्र.नारायण राजपुत वय-४३ धंदा शेती रा. मु. तलाववाडी पो करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. राहुल पि. नारायणसिंग राजपुत वय-२६ धदा शेती रा-मु.तलाववाडी पो. करजखेडा (ज) ता-कन्नड जि औरंगाबाद ४. रणजित पि. नारायण राजपुत वय-२४ धंदा शेती रा-मु. तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता कन्नड जि. औरंगाबाद ५. रेणुका पि. नारायण राजपुत वय-२३ धंदा शेती रा. मु.तलाववाडी पो करंजखेडा (ज.) ता-कन्नड जि. औरंगाबाद ६. कांताबाई भ्र. कैलास राजपुत वय ४१ घंदा शेती रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि औरंगाबाद ७. रवि पि.कैलास राजपुत वय-१९ धंदा शिक्षण रा. मु. तलाववाडी पो. करजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद ८. पोर्णिमा पि.कैलास राजपुत वय-१४ धंदा- शिक्षण रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता-कन्नड जि. औरंगाबाद तर्फे अ.पा.क. म्हणुन अर्जदार क. ६ कांताबाई भ्र. कैलास राजपुत जनक आई ९. निर्मलाबाई भ्र. संतोषसिंग कुठंबरे वय-४५ धंदा घरकाम रा. मु.बोरगांव वाडी ता. जाफ्राबाद जि. जालना १० नंदा भ्र.पवन कायटे वय-३५ धंदा घरकाम रा मु. पो. भिलदरी (पि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार -महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत. ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ६ चे सासरे व अर्जदार क. २ ते ५ व ७.८ याचे आजोबा व अर्जदार क. ९ व १० यांचे वडील मयत नामे फकिरचंद पि.बाळाराम राजपुत यांचा मृत्यु दि. २६/०४/२०१३ रोजी मौजे तलाववाडी ता.कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते १० हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत फकिरचंद पि. बाळाराम राजपुत यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत फकिरचंद पि.बाळाराम राजपुत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यानी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणाचा उजर आक्षेप हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर आक्षेप गाहय धरला जाणार नाही

करीता आज दि ०५/०३/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

जाहीर प्रगटन

मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.

दि.कि. अर्ज नं. १३३/२०२५

पुढील तारीख २६/०३/२०२५

अर्जदार : १. मुख्तयारशा चांदशा शहा, वयः ५५ वर्ष, धंदाः शेती, रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. अब्दुलरहिम चांदशा शहा, वय. ४९ वर्ष, धंदा. शेती, रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. इब्राहिमशा चांदशा शहा वय. ४६ वर्ष. धंदा. शेती.रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. हकीमशा चांदशा शहा वय. ४४ वर्ष. धंदा. शेती.रा. रायगाव, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. मलेखाबी मुसा शहा वय. ७६ वर्ष, धंदा. घरकाम रा. पिसा देवी रोड अब्रार कॉलनी. औरंगाबाद ६. खातिजाबी रउफ शाह वय. ६९ वर्ष धंदा. घरकाम. रा. तळणी ता. सिल्लोड जि. औरंगाबाद. ७. रुबाबबी समद शहा वय. ४७ वर्ष, धंदा. घरकाम. रा. पिंपरखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ८. शबाना दगडु शहा वय. ४९ वर्ष, धंदा घरकाम रा. महाराणा प्रताप नगर मिसारवाडी औरंगाबाद. ९. आलमनुर आरेफ शहा वय. ३९ वर्ष, धंदा घरकाम रा. नायगाव औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ९ हे मयत चांदशा सुलेमानशा शहा यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ९ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयम चांदशा सुलेमानशा शहा यांचे अर्जदार क्र. १ व ४ मुले व अर्जदार क्र. ५ ते ९ मुली आहे. नामे मयत चांदशा सुलेमानशा शहा यांना अर्जदार क्र. १ ते ९ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत चांदशा सुलेमानशा शहा अर्जदार क्र. १ ते ९ यांचे वडील हे दि. २७/११/२०१४ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा रायगाव येथे करण्यात आलेला आहे. मयत चांदशा सुलेमानशा शहा यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते को, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि::२८/०२/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

संघ हीच जीवनगाथा

अलकः- (७३) स्वयंसेवकत्व

डॉक्टर हेडगेवार यांनी १९४० साली एका ३५ वर्षाच्या माधव नावाच्या युवकाच्या हातात संघ सोपवला. आणि अध्यात्म मार्ग स्वीकारू इच्छिणाऱ्या माधवने आपला मार्ग बदलून समाज साक्षात्काराचा मार्ग संघाच्या रूपात स्वीकारला. आणि त्यांनी भगव्या ध्वजाला गुरु केले. तेव्हाच्या तरुण भारत वृत्तपत्राचे संपादक ग.त्र्य. माडखोलकर गुरुजींना विचारते झाले की आश्रम आणि संघ यांच्या भूमिकेतच अंतर आहे; मग संघ हीच जीवन गाथा स्वरूपात स्वीकारताना आपण कोणती मोजपट्टी मोजली. गुरुजी तडक आत्मविश्वासाने उत्तरले की मी संघ कार्यामुळेच स्वामी विवेकान

अग्रलेख...

सुधारणेतून सुरक्षिततेची हमी!

जन्माला येणाऱ्या प्रत्येकास माणूस म्हणून ओळख मिळते. ते नैसर्गिकही आहे. पण नागरिक म्हणून किंवा कोणत्याही एका देश, प्रदेशातील समूहातील व्यक्ती म्हणून ओळख मिळण्यासाठी त्याच्या माणूसपणालाही नागरिकत्वाच्या कायदेशीर बाबींचे कवच असणे गरजेचे असते. ते तसे नसेल तर माणसाच्या नागरिकत्वाची ओळख पुसली जाते आणि नागरिकत्व नसलेल्या माणसास त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी असलेल्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते. म्हणूनच जन्माला आल्यानंतर होणारी पहिली कायदेशीर सरकारी नोंद म्हणजेच, जन्माचा दाखला हा माणसाच्या नागरिकत्वाचा पहिला पुरावा ठरतो आणि अशी नोंद असणे हा जन्माला येणाऱ्या बाळाचा नागरिक म्हणून पहिला हक्क असतो. पण या हक्काला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागते. जेथे कायदे असतात तेथे त्यापासून बचाव करण्याच्या पळवाटाही असतात. बनावटगिरी करणाऱ्या टोळ्या जागोजागी उगवत गेल्या आणि ज्यांना कायदेशीरपणे हा हक्क मिळविता येत नाही त्यांच्याकरिता बनावट जन्मदाखले देऊन त्याद्वारे पैसा कमावण्याचा भ्रष्ट मार्ग उदयास आला. हा भ्रष्टाचार आजचा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून त्याची पाळेमुळे जागोजागी रुजत गेली. अशा घुसखोरांना आश्रय देण्यासाठी बनावटगिरीचा भ्रष्ट मार्ग अवलंबिणे हा खरे तर देशद्रोह आणि अधिकृत नागरिकांच्या हक्कावरील घाला ठरतो. पण केवळ कोणत्याही मार्गाने पैसा कमावण्याची हावरट वृत्ती वाढत गेली की, भ्रष्टाचाराची लाज वाटणे बंद होते आणि भ्रष्टाचारात बुडाल्याने निर्ढावलेल्या मनाला देशद्रोहाच्या जाणिवा किंवा अन्यांच्या कायदेशीर हक्कांची पायमल्ली केल्याचे दुःखदेखील जाणवत नाही. असा निर्ढावलेपणा अनेकदा सरकारी कर्मचाऱ्यांत उघडकीस आला आहे. खरे तर सर्वसामान्य समाजास भ्रष्टाचाराचे वावडेच असते. भ्रष्ट मार्गाने कोणत्याही सवलती, लाभ प्राप्त करून घेणे किंवा व्यक्तिगत कामे करून घेणे कोणासही फारसे रुचणारे नसते. पण भ्रष्टाचाराची एक साखळी असल्याने, अशा साखळीत जखडल्या जाणाऱ्या व्यक्तीस अनिच्छेनेदेखील भ्रष्ट मार्गाचा अवलंब करावा लागतो. आपण कधीच कोणताही भ्रष्टाचार केला नाही किंवा भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून कोणतेही गैरफायदे उकळले नाहीत, असे छातीठोकपणे सांगणारी माणसे आज समाजात अभावानेच आढळतील, हे वास्तव असल्याने भ्रष्टाचार हाच शिष्टाचार समजणाऱ्या प्रवृत्ती उजळ माथ्याने वावरत असतात. म्हणूनच पहिल्या हक्कावर घाला घालणारा हा भ्रष्टाचार देशात बोकाळत गेला आणि नागरिकत्वाचे मूलभूत हक्क बहाल करणाऱ्या या सरकारी कागदास बनावटगिरीचा बेमालूम मुलामा देऊन तो विकण्याचा धंदा झाला. गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये अशाच धंद्याचा एक अड्डा उत्तर प्रदेशात रायबरेली जिल्ह्यातील सलोन या गावात उघडकीस आला होता. देशभरातील कोणत्याही राज्याच्या कोणत्याही गावात जन्म झाल्याचा पुरावा म्हणून जन्माचे दाखले देणाऱ्या या टोळीने जवळपास दीड वर्षांहून अधिक काळापासून अवैधपणे राहणाऱ्या अनेकांना जन्माचा दाखला देऊन जन्मतः मिळणारा पहिला हक्क बनावटगिरीने बहाल केला. उत्तर प्रदेशातील ४७ जिल्ह्यांतील नागरिकांचे जन्मदाखले याच गावातील या टोळीनेच तयार केल्याची धक्कादायक बातमीही त्यावेळी उजेडात आली. सरकारी यंत्रणा सजग झाल्या आणि हाथरसमधील एका गावात व्हिडीओद्वारे बनावट ओळखपत्र तयार करून दाखलेदेणाऱ्या टोळ्यांचाही छडा लागला. या टोळ्यांनी बिहारबरोबरच हरयाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेशातील नागरिकांनाही जन्माचे बनावट दाखले विकल्याचे स्पष्ट झाले.

देशभरातील अनेक ठिकाणी चालणारा हा धंदा अद्याप बंद झालेला नाही. महाराष्ट्रात मालेगाव, अमरावती, लातूर यांसारख्या शहरांत बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बनावट जन्मदाखले मिळविल्याचे काही धागेदोरे सरकारच्या हाती लागले आहेत. त्यामुळे केवळ माणूस असण्याचा गैरफायदा घेऊन नागरिकत्वाच्या कायदेशीर हक्कांवर गदा आणणाऱ्या या प्रकाराची सध्या महाराष्ट्रात चर्चा सुरू आहे. यापैकी काही उघडकीस आलेल्या प्रकरणांची चौकशी सुरू आहेच; पण तेवढी बाब पुरेशी नाही, हे ओळखून राज्य सरकारने आता कायद्याच्या चौकटी अधिक काटेकोर राहण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या आठवड्यात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात याची घोषणा केली आणि जन्म-मृत्यूच्या बनावट दाखल्यांचा धंदा रोखण्यासाठी १९६९ च्या संबंधित कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती आखून देणारा निर्णयही जाहीर केला. आता त्याचा शासकीय आदेश जारी झाला असल्याने महाराष्ट्रात अवैधपणे घुसखोरी करून नागरिकत्वाचे लाभ मिळवत बेकायदा धंद्यांना खतपाणी घालणाऱ्या परकीय व्यक्तींच्या व बनावट दाखले तयार करून देणाऱ्या टोळ्यांच्या मुसक्या आवळण्याचा मार्ग सोपा झाला आहे. दीर्घकाळापासून या धंद्याची कुणकुण सरकारी यंत्रणांना लागली होती. अशी काही प्रकरणे आसपास असल्याची कुजबूजही कुठे ना कुठे कानावर येत होती, पण त्याचा बीमोड करण्याची इच्छाशक्ती मात्र महायुती सरकारने दाखविली, याबद्दल फडणवीस सरकारचे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाचा पुरेपूर पाठपुरावा करून काही प्रकरणांची पाळेमुळे खणून काढली. एका राष्ट्रीय हक्काच्या लढ्यातील त्यांचा हा सहभाग अभिनंदनीय ठरतो.

केवळ नागरिकत्वाचे हक्क बेकायदेशीरपणे उकळणे एवढाच या धंद्यातून निर्माण झालेला धोका नाही. बेकायदेशीरपणे देशात घुसखोरी करून असे दाखले मिळवत राजरोसपणे नागरिक म्हणून वावरणाऱ्या बांगलादेशी किंवा रोहिंग्यांमुळे देशाच्या सुरक्षिततेसही गंभीर धोका संभवत असल्याने, घुसखोरी रोखण्याचे आव्हान स्वीकारण्याचे पहिले पाऊल म्हणून महायुती सरकारच्या या निर्णयाकडे पाहावयास हवे. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना बनावट दाखले सहज प्राप्त करता येऊ नयेत आणि भारतीयांच्या नागरिकत्वाच्या हक्क प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी संबंधित बदल करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी विधिमंडळात दिली. बनावट जन्मदाखले हा केवळ कागदोपत्री फेरफार करून होणारा भ्रष्टाचार नाही, तर त्यामागे घुसखोरी करून देश अस्थिर करणाऱ्या कारवाया करण्याचे एक मोठे षडयंत्रदेखील आहे. दहशतवादी कारवायांना पोषक वातावरण निर्माण करण्याच्या हालचाली व समाजात भीतीचे वातावरण पसरविणाऱ्या कारवायांमागे अशाच शक्तींचा हात असल्याचा संशय व्यक्त होत असतो. अवैधपणे घुसखोरी करून बनावट दाखल्यांच्या आधारे सरकारी योजनांचा लाभ मिळविल्याची काही प्रकरणे लाडकी बहीण योजनेच्या पडताळणीतही उघड झाली होती. त्यामुळे राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय एक मोठे षडयंत्र उद्ध्वस्त करणारा ठरू शकेल. अर्थात, सरकारी यंत्रणेतील लोभीपणातून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणारे झारीतील शुक्राचार्य ही या धंद्याची बीजे आहेत. सरकारी कार्यपद्धतीमधील या त्रुटी दूर करण्यासाठी असे प्रकार झाल्याचे सिद्ध होताच संबंधितावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा निर्णयही सरकारने जाहीर केला असून त्याची कार्यवाही करण्याची इच्छाशक्ती दाखविण्याचे आव्हानही आता शासनास पेलावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या मालेगावसारख्या शहरात हजारो खोटे दाखले देण्यात आल्याच्या तक्रारी सुरू होताच सुमारे तीन हजार दाखले रद्द करण्यात आल्याने सरकारी यंत्रणेतील त्रुटींवर नेमके बोट ठेवले गेले आहे. याच दाखल्यांचा आधार घेऊन अनेक बांगलादेशी घुसखोरांनी भारतीय नागरिक असल्याचा पहिला हक्क प्राप्त केला होता, असेही स्पष्ट झाले आहे. या भ्रष्टाचारात हात असल्याच्या आरोपावरून दोघा सरकारी अधिकाऱ्यांना निलंबित करून राज्य सरकारने आपल्या इच्छाशक्तीचा पुरावा दिला आहेच; पण प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारीच्या जाणिवेची हमीदेखील दिली आहे. त्यामुळे कायद्यात केलेल्या या सुधारणा म्हणजे केवळ प्रशासकीय सुधारणा नाहीत, तर देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेली एक यशस्वी रणनीती ठरली आहे. नागरिकत्वाचा हक्क मिळण्याची प्रक्रिया विश्वासार्ह अशीच असली पाहिजे. त्याची हमी आता प्रामाणिक नागरिकांना मिळेल, यासाठी सरकारच्या नव्या नीतीचे स्वागत करायलाच हवे!

जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

महाभारत ते भारत (१५)

श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात, जग हे धकाधकीचा मामला आहे. संघर्ष, स्पर्धा, ईर्ष्या, प्रभुत्वाची आवड हे मानवी स्वभावाचे मानसशास्त्र आहे. मूलभूत प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीला अनुसरून विविध साधनांचा उपयोग करून वरील वृत्तीला तृप्त करण्याचा प्रयत्न सतत चालत असतो. त्यातूनच व्यक्तिगत स्तरापासून तो जागतिक स्तरापर्यंतच्या विविध स्पर्धायुक्त संघर्षाच्या ठिणग्या अखंडपणे उडत असतात. त्याच ठिणगीचा वणवा होऊन त्यातून 'महायुद्धे' निर्माण होतात. महाभारतातील कुरुक्षेत्रापासूनचा प्रारंभ झालेला हा प्रवास अद्यापही थांबलेला नाही. त्याचे साद-पडसाद जगातील अनेक भागात आजही उमटताना दिसतात. त्याचमुळे प्रत्येक राष्ट्राला सर्वप्रकारच्या अस्त्र सामर्थ्याने 'नित्यसिद्ध' राहणे, ही काळाची गरज आहे. महाभारताचा अधिकृत वारसदार असलेल्या आधुनिक भारताला तर आहेच आहे. महर्षी व्यासांचा आदेशही तोच आहे, संदेशही तोच आहे की, ''लक्षात ठेवा की, 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र.' त्यासाठी 'पार्था अस्त्रसिद्ध' हो.'' या आदेशाने जसे पांडव संघर्ष सिद्ध झाले त्याप्रमाणे देश, धर्म, समाज आणि संस्कृतीच्या संरक्षणार्थ आणि त्याचा विनाश करण्याचे स्वप्न जोपासणाऱ्या आधुनिक 'धृतराष्ट्रीं' मनोवृत्तीशी दोन हात करण्यासाठी चक्रवर्ती भरताचे वारसदार असलेल्या प्रत्येक भारतीयाला तयारच राहावे लागेल, ही काळाची चेतावणी आहे. आधुनिक भारताची अस्त्रसिद्धतेकडे त्या दृष्टीने वाटचाल चालू आहे. विविध प्रकारची अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आणि मिसाईल्स आपल्या 'डी.आर.डी.ओ' आणि 'इस्रो'सारख्या संस्थांद्वारा संशोधित होताहेत; त्यांचे यशस्वी प्रक्षेपण होत आहे, हे भारताच्या भविष्यकालीन होणाऱ्या वाटचालीची हमी देणाऱ्या आणि स्वामी विवेकानंदांनी शंभर वर्षांपूर्वी 'आता केंद्र भारत वर्ष' या केलेल्या भविष्यवाणीची पूर्ततेकडे होणाऱ्या फलनिष्पत्तीचे दर्शक आहे, असे समजायला हरकत नाही.

अत्याधुनिक समजले जाणारे अणुविज्ञान आणि त्यावर आधारित असलेली विविध अस्त्र संपदा या गोष्टी भारतीय ज्ञानपरंपरेला नवीन नाहीत. प्राचीन काळापासून रामायण, महाभारत या महाकाव्यात त्याचे स्पष्ट उल्लेख सापडतात. महज विश्वामित्र हे विविध अस्त्रांचे ज्ञाते म्हणून आजच्या परिभाषेत संशोधक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी यज्ञ रक्षणासाठी राम आणि लक्ष्मण यांना सोबत घेतले. त्या प्रवासात त्यांनी एका मुक्कामात त्या दोघांना गायत्री मंत्रावर अधिष्ठित सुमारे ३०० महाअस्त्रांचे विधिवत दान केले. त्यांचे प्रयोग, प्रकटीकरण, स्तंभन, प्रक्षेपण, उपसंहार या विविध प्रक्रियांचे तंत्र (टेक्निक) त्यांना सांगितले. त्याचा उपयोग राम-लक्ष्मणांनी यज्ञ संरक्षणाच्या वेळी स्वर, दुपण, मारीच यांच्याशी झालेल्या युद्धात १६ हजार बलाढ्य राक्षसांचा विनाश करण्यात यशस्वीपणे केला. पुढे रावणाशी झालेल्या सर्वंकष युद्धातही त्यांना त्याचा उपयोग झाला, हे आपल्याला विदित आहेच.

अणुविज्ञानावर आधारित, मंत्र सामर्थ्यावर अधिष्ठित ही अस्त्र-परंपरा महाभारतात अतिशय विकसित स्वरूपात, बहुआयामी आणि अतिशय सूक्ष्म स्वरूपात (इन सटल फॉर्म) विद्यमान असलेली आढळते. आधुनिक अस्त्र निर्मितीमुळे त्यासंबंधात प्राप्त झालेल्या ज्ञानामुळे आता रामायण-महाभारतात वर्णन केलेल्या या गोष्टी वा युद्धाची वर्णने ही आधुनिक न्युक्लिअर सायंटिस्टला कविकल्पना वा 'पुराणातील वांगी' वाटत नाहीये तर त्यांना त्यात 'सम ग्लिमसेस ऑफ न्यूक्लिअर फ्युझन अँड कॉम्बिनेशन्स' जाणवत आहेत. (एक रशियन संशोधक). त्यामुळे ते भारताच्या प्राचीन युद्ध विज्ञान व त्यातील अस्त्र संपदेकडे आकर्षित झाले आहेत. त्याचे काही उल्लेख आपण मागील दोन लेखांमध्ये पाहिलेच आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील अणुविज्ञानाची शास्त्रशुद्ध परंपरा ही प्राचीन असली, तरी तिचे शास्त्रीय स्वरूप महर्षी कणाद यांच्या वैशेषिक दर्शनात आबद्ध असलेले आपल्याला दिसते. अणू-परमाणूच्या मूलभूत शास्त्रीय व्याख्या (डेफिनेशन्स) शिवपुराण, वायुपुराण यात आढळून येतात. या क्षेत्राशी संबंधितांनी मुळातून त्यांचा शोध घ्यावा. श्री समर्थांनी उपासनेसाठी रचलेले भीमरूपी स्तोत्रात 'अणुपासोनि ब्रह्मांडा एवढा होत जातसे...' त्याच्या पुढे 'मेरुमांदारही धाकुटे' वाटू लागतात. अशा अणूच्या सर्वव्यापी स्वरूपाचे व इतर पदार्थांशी असलेली त्याची सापेक्षता (रिलेटिव्हिटी) स्पष्ट केली आहे. अशा अनेक वैज्ञानिक संकल्पना आपल्या उपासना शास्त्रात दिसून येतात. त्या दृष्टीने आपण उपासना करीत असू तर! कोणत्याही ज्ञान परंपरेचा, शास्त्र परंपरेचा अधिकृत पुरावा हा त्या विषयाशी संबंधित ग्रंथसंपदा असते. भारतात नालंदा आणि तक्षशिला येथे या विविध शास्त्रांशी संबंधित सहस्रावधी ग्रंथाचा संग्रह होता. मानवतेचे, सुसंस्कृतीचे, विविध ज्ञानशाखांचे नष्टचर्य हेच ज्यांच्या धर्मांधतेचे एकमेव लक्षण असलेल्या बख्त्यार खिलजीने विश्वविद्यालयात शिकविणाऱ्या १६०० प्राध्यापकांची कत्तल आणि ६० हजार ग्रंथांना आग लावून भस्म करण्याचे नृशंस कृत्य केल्याची नोंद इतिहासाने केली आहे. त्यातून फार थोडे ग्रंथ परदेशी प्रवाशांनी त्यांच्या देशात नेले. बौद्ध भिक्षूंनी तिबेटमध्ये नेलेत. त्यावरूनही अणुविज्ञान, अस्त्रविज्ञान किती पराकोटीला गेले होते, याची कल्पना येऊ शकते. त्यातील काही प्रमुख ग्रंथांची नावे अशी-

१) शक्ती तंत्र : महर्षी अगस्ती- मूळ प्रकृतीपासून निर्माण होणाऱ्या ३२ विविध एनर्जीचे विश्लेषण.

२) अंशुबोधिनी : महर्षी भारद्वाज- अणू-परमाणू, त्यांची स्पंदने, गती त्यांचे संघनन (ऑसिमिलेशन), विघटन (अणूचे विच्छेदन) याचे तंत्र सूर्यकिरणातील विविध शक्तीचे मापन यांच्या साह्याने अस्त्रांचा वापर महाभारतातील द्रोणाचार्य हे भारद्वाज कुलोत्पन्न होते.

३) सौदामिनी कला : महर्षी मातंग- यात प्रकाशलहरी व नादलहरी यांच्या संशोधनातून अनेक अद्भुत प्रयोगांची क्षमता असणारी अस्त्रसंपदा निर्माण करणे.

४) यंत्र सर्वस्व : भारद्वाज- संकल्पानुसार टारगेट-ओरिएंटेड मिसाईल युक्त अनेक यंत्रांची, विमानांची निर्मिती कशी करायची, याचे समग्र विवेचन करणारा ग्रंथ. (स्वर्गदर्शन ग्रंथामधून १९५९)

या प्रकारच्या अनेक ग्रंथांची निर्मिती ऋषिमुनींनी केली होती. त्यावर आमचे युद्ध विज्ञान आधारित होते. उग्र तपस्येमुळे 'शापदग्ध' करण्याच्या मंत्रशक्तीचे मनोबल आमचे होते तर त्याच धारावरील अस्त्रविद्येने आम्ही युद्धात अजिंक्य असे होतो. 'शापादपि शरादपीचे' सामर्थ्य असलेल्या असंख्य अशा नरसिंहाचा हा भारत होता. त्याचमुळे 'कृण्वन्तो विश्वमार्यम्?' ही त्याची गर्वोन्नत मानेनी, आत्मविश्वास संपन्नतेची घोषणा होती. आव्हान होते.

...आज ते 'आव्हान' आम्ही देऊ शकू का?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

वेध

प्रफुल्ल क. व्यास

पोलिस दादा असे काय करता?

समाजात शांतता आणि सौहार्द राखणे, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना नियंत्रित करणे, वेळप्रसंगी त्यांना अटकही करण्याचे कर्तव्य पोलिसांना पार पाडावे लागते. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' म्हणजे चांगल्यांचे रक्षण करणे आणि वाईटांचा नाश करणे हे ब्रीद घेऊन पोलिस तुमच्या आमच्या सेवेत '२४ बाय ७' असतात. त्यांना उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्याची चिंता नसते. फक्त कायदा व सुव्यवस्था कायम राखणे हीच त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका. महाराष्ट्र पोलिस भारतातील सर्वात मोठ्या पोलिस दलांपैकी एक आहे. महाराष्ट्र पोलिस दल २ जानेवारी १९६१ रोजी स्थापन झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी महाराष्ट्र पोलिस दलाला ध्वज प्रदान केला; तोच पोलिस दलाचा स्थापना दिन समजला जातो. महाराष्ट्र पोलिस दलात १२ पोलिस आयुक्तालये व ३४ पोलिस अधीक्षक कार्यालयं आहेत. गंभीर परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अतिरेकी कारवायांना तोंड देण्यासाठी राज्य राखीव पोलिस दल, गुन्ह्यांच्या तपासासाठी गुन्हे शाखा, वाहतूक व्यवस्थापन आणि रस्ते सुरक्षेसाठी वाहतूक शाखा, सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सायबर गुन्हे शाखा, दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी दहशतवादविरोधी पथक तयार करण्यात आले आहे. सामान्य नागरिकांना थेट संपर्क करता यावा यासाठी पोलिस नियंत्रण कक्ष १००, महिला हेल्पलाईन १०३, ज्येष्ठ नागरिक हेल्पलाईन १०९०, सायबर हेल्पलाईन १९३० या क्रमांकावर डायल केल्यास पोलिस अवघ्या काही मिनिटांत म्हणजे शक्य होईल तेवढ्या कमी वेळात घटनास्थळी पोहोचतात, असा दावा केला जातो. पोलिस कर्मचाऱ्यांची नोकरी फारच जिकरीची आहे. दोन दिवसांपूर्वी नागपुरात झालेल्या दंग्यात पोलिसांवर दगडफेक झाली तर वरिष्ठ पोलिस अधिकारी कुऱ्हाडीचा घाव झेलत जखमी झाले. कमी वेतन असलेले पोलिस असे काहीसे चित्र आता पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी पोलिसांना पगारच काय मिळतो म्हणून ते चिरीमिरीच्या मागे लागतात, असे बोलले जात होते. आता मात्र त्यांची ती परिस्थिती राहिलेली नाही. (कोणत्याही पदावर, कोणत्याही शासकीय विभागात आणि वेतन कितीही रग्गड असले ते खिसा गरम करीत नाही, असे नाही. त्यामुळे त्यातून पोलिस तरी कसे सुटावे). पण, पोलिस प्रशासन हे सामान्य नागरिकांसोबत थेट संपर्कात येते. त्यामुळे त्यांनी दुःखी-कष्टी सामान्य नागरिकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजे. झाले असे की, वर्धा जिल्ह्यातील वडनेर येथील मूळ रहिवासी असलेल्या दर्शन मुंगळे या २५ वर्षांच्या तरुणाचा जालना जिल्ह्यातील देऊळगाव राजानजिक रस्त्यावर अपघात झाला. पोलिसांच्या नजरेत तो अपघात तर त्या मुलाच्या पालकाच्या भावनांतून तो घातपात! दोघांचेही आपआपल्या ठिकाणी सत्य असल्याचे आपण एकदा समजून घेऊ. पण, ज्यांच्याकडे समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली त्यांनी आपल्या पदाला न्याय देत आलेल्यांचे समाधान केलेच पाहिजे ना! त्याच कर्तव्याचे वेतन शासन आपल्या बँक खात्यात जमा करते, हे विसरता कामा नये! पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी त्या युवकाचे वडील घटनास्थळावर नव्हते. तरीही पंचनाम्यामध्ये चक्क घटनास्थळ मृतकाच्या वडिलांनी दाखवल्याचे लिहून मोकळे झाले. मृतकाचे शवविच्छेदन अहवाल पोलिसांनी आणणे अपेक्षित असताना जालना पोलिसांनी मृतकाच्या वडिलांना अहवाल आणण्याचा सल्ला दिला. आता सांगा, तो अहवाल वर्धेतून जालन्यात गेलेल्या मृतकाच्या पालकांना कसा दिला जाईल! विशेष म्हणजे ज्या मुलाला अपघात झाला त्या मुलाच्या मोबाईलचा सायबर विभागाकडून सीडीआर दिलाच गेला नाही. तरुण मुलगा गेल्यानंतर त्या बापाच्या वेदना समजू नये? आमचा अजूनही खाकीवर विश्वास आहे. तरीही पोलिस दादा तुम्ही असे का वागू शकता. हो, आहे तुमच्यावर कामांचा ताण. तुम्हाला अधिकार आहेत म्हणून काय, तुम्ही आलेल्यांना हेलपाटेच मारायला लावणार? काल-परवा वर्धा पोलिसातील एका सहायक पोलिस निरीक्षकाने वन विभागाच्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. हा मुद्दा आर्वीचे आ. सुमित वानखेडे यांनी अधिवेशनात उपस्थित केला. पोलिसावर निलंबनाची कारवाई झाली. म्हणून गावागावांत आ. वानखेडे थोडीच उभे होणार आहेत. याचा अर्थ पोलिस खातेच वाईट आहे असेही नाही. काही पोलिस कर्मचारी, अधिकारी अपवादही आहेत. पण, आपल्याकडे चांगल्यापेक्षा वांगल्याचीच चर्चा जास्त होते. विविध पुस्तके, चित्रपट, टीव्ही मालिकांमधून देशातील पोलिस दलाचे बरेवाईट चित्रणही झाले. फ. मुं. शिंदे यांची 'पोलिस नावाचा माणूस' ही बोलकी कविता आहे. त्यात पोलिसांची व्यथा त्यांनी मांडली असली, तरी सामान्यांच्या व्यथा पोलिस दादांनी समजून घेतल्या पाहिजे तेव्हाच खाकीवरचा विश्वास अजून दृढ होईल पोलिस दादा!

९८८१९०३७६५

दखल

मोरेश्वर बडगे

धर्मयोद्धा देवेंद्र फडणवीस

बऱ्याच वर्षांनंतर नागपूरने भयंकर दंगल अनुभवली. नागपूर शहर तसे पाहिले तर दंगलीचे गाव नाही. इथे साऱ्या जाती-धर्माचे लोक सलोख्याने राहत आले आहेत. नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस या दोन नेत्यांच्या गावात दंगल होते, जाळपोळ होते, लोकांपेक्षा पोलिस जास्त जखमी होतात हा प्रकार चिंतेचा विषय नक्कीच होतो. प्रभू श्रीरामाच्या शोभायात्रेवर फुले उधळणारा समाज अचानक असा का बिथरला? या दंगलीमागे सुनियोजित कट आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दंगेखोरांचे चेहरे चौकशीत फाटतील, पण गृहमंत्री या नात्याने फडणवीसांनी दंगल पसरू दिली नाही हे महत्त्वाचे. दुसरा एखादा असता तर बावचळून नको ते आदेश दिले असते. परिस्थिती चिघळली असती. गोळीबारात मेलेल्यांना दंगलखोरांनी 'हुतात्मा' म्हणून मिरवले असते. देशभर दंगे भडकले असते. फडणवीसांनी त्यांना ती संधी दिली नाही. पोलिसांनी दगड अंगावर झेलले. ३३ पोलिस रक्तबंबाळ झाले. पण एकही गोळी सुटली नाही. एका पोलिस उपायुक्तांच्या पायावर कुऱ्हाड चालली. त्याच्या कंबरेला पिस्तूल होती. तो पिस्तूल झाडू शकला असता. फडणवीसांची रणनीती हिट झाली. एकाच दंग्यात लाखो पोलिसांचे 'हिंदुत्व सेने'त रूपांतर झाले. फडणवीस एका अर्थाने 'धर्मयोद्धा' ठरले आहेत.

फडणवीस यांच्याकडे साईबाबाने सांगितलेले श्रद्धा आणि सबुरी हे दोन्ही गुण आहेत. औरंगजेबाच्या कबरीच्या बंदोबस्ताला ते आपले पोलिस देतात तेवढ्याच खंबीरपणे कबरीचे महिमामंडन होऊ देणार नाही हेही सांगतात. गुणांचा हा संगम बाळगणारे असे नेते अलिकडे दुर्मिळ झाले आहेत. म्हणूनच फडणवीसांचे वेगळेपण ठळकपणे नजरेत भरते. हिंदू धर्म संकटात आहे असे ज्यांना ज्यांना वाटते त्या त्या सर्वांनी फडणवीस यांचे अभिनंदन केले पाहिजे. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. गुढीपाडव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात येत आहेत. दंगलीचे वातावरण टिकले असते तर मोदींचा दौरा रद्द होण्याची शक्यता होती. फडणवीसांच्या प्रयत्नाने मोठी विदेशी गुंतवणूक राज्यात येऊ घातली आहे. तिला ब्रेक लागायचीही भीती होती. दंग्याच्या गावात कुठला उद्योगपती कशाला पैसे लावणार? तरीपण नागपुरात दंगल होते हा विषय सर्वांनाच चिंतन करायला भाग पाडणारा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म जिथे झाला त्या नागपुरातच हिंदू मार खात असतील तर जगातल्या हिंदूंनी कोणाकडे आशेने पाहायचे, असा प्रश्न सर्वसाधारण हिंदूंना पडणे स्वाभाविक आहे. पण म्हणून डोक्यात राख घालून चालणार नाही. कायद्यानेच चालावे लागेल. फडणवीस शांत डोक्याने तेच करीत आहेत. काट्याने काटा. सामान्य मुसलमान शांतताप्रिय आहे. या दंगलीमागे धर्मांध माणसं आहेत. त्यांना कसे हाताळायचे ते फडणवीस यांना छान ठाऊक आहे. नरेंद्र मोदींचा 'गुजरात पॅटर्न' फडणवीस चालवतील. सध्या रात्री वैऱ्याच्या आहेत. समाज ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. साध्या साध्या गोष्टीही हवा पेटवू शकतात. त्यासाठी बुलडोझर घेऊन फिरण्याची गरज नाही. कडक प्रशासन दिले तर दंगेखोरांची हिंमत होणार नाही. फडणवीस यांचा हाच फॉर्म्युला आहे. खऱ्या अर्थाने फडणवीस हे धर्मयोद्धा आहेत.

तरीही नागपुरातच दंगल का व्हावी हा प्रश्न छळतो. औरंगजेबाची कबर तिकडे मराठवाड्यात आहे. तिकडे काही होत नाही आणि इकडेच मूठभर मुसलमान दंगा करतात, याचे कोडे अनेकांना सुटत नाही. सोपे आहे. नागपुरात संघाचे मुख्यालय आहे. दुसरे म्हणजे सध्या राज्यातल्या हिंदूंचा चेहरा देवेंद्र फडणवीस नागपूरचा आहे. त्यामुळे त्यांचे टार्गेट नागपूर झाले. विरोधकांच्या निशाण्यावरही फडणवीसच आहेत. गेल्या पाच वर्षांत फडणवीसांनी विरोधी पक्षांना अस्वस्थ करून सोडले आहे. त्यांनी उद्धव ठाकरेंची शिवसेना फोडली. शरद पवार राष्ट्रवादी पक्ष फोडला. छळकपटाने आलेले उद्धव ठाकरेंचे महाविकास आघाडीचे सरकार पाडले. फोडाफोडी करून आलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपाच्या सरकारसोबत आहेत तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार रस्त्यावर आहेत. जळफळाट आहे तो हा. कसेही करून देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करायची संधी विरोधी पक्ष शोधत आहेत. त्यांच्या हाती काही लागत नव्हते. औरंग्या नावाचा फटाका त्यांनी फोडून पाहिला. पण तो चक्र लवंगी फटका निघाला. विरोधकांची फजिती सुरू आहे. फडणवीसांना कसे रोखावे हेच त्यांना कळेनासे झाले आहे. नाना पटोले यांच्या जागी राहुलबाबाने पाठवलेले हर्षवर्धन सपकाळ तर नमुना निघाले. सपकाळांनी फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केली. मुख्यमंत्री फडणवीस हे औरंगजेबापेक्षाही क्रूर प्रशासक आहेत, असे बोलून सपकाळांनी काँग्रेसचीच गोची केली. पुढे त्यांनी सारवासारव केली तो भाग वेगळा. नाना पटोले काँग्रेस बुडवायला निघाले म्हणून त्यांना बदलायचे ठरले. पण आणायचे कोणाला? काँग्रेसकडे लायक माणसं कुठे आहेत? जी येतात तो मोठी व्हायला येतात. काँग्रेस मात्र बुटकी होत जाते. शेवटी राहुलबाबाने चिट्ठी काढली असणार. पहिल्या चिट्ठीत हे सपकाळ काँग्रेसच्या पदरी आले. आतापर्यंत काँग्रेस हा मुस्लिमांचा पक्ष अशी प्रतिमा होती. सपकाळांनी काँग्रेसला हिंदुविरोधी पक्ष बनवून टाकले. म्हणजे घाट्यात घाटा. एक लक्षात घ्या. सामान्य मतदार आता हुशार झाला आहे. हिंदुविरोधी भूमिका घेऊन यापुढे कोणी सत्तेत येऊ शकत नाही. औरंगजेबाच्या कबरीच्या काय व्हायचे ते होईल. मात्र इकडे काँग्रेसचे नेतेच काँग्रेसची कबर खोदायला निघाले आहेत. तुम्ही लिहून घ्या. पुढची निवडणूक काँग्रेस पाहत नाही. पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचे ४४ आमदार निवडून आले होते. यावर्षी काँग्रेस पाचव्या नंबरला आहे. फक्त १६ आमदार. शिवसेना फुटली तरीही उद्धव ठाकरेंनी २० आमदार आणून चौथा नंबर पटकावला. मात्र, काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाच्या तब्बल २८ जागा कमी होतात, या तब्येतीला काय म्हणायचे?

आता तर कहर झाला. विधान परिषदेची निवडणूकही काँग्रेस लढवू शकत नाही. केविलवाणी स्थिती आहे. काँग्रेस काय, उबाठा आणि शरद पवारांची राष्ट्रवादीही लढवू शकत नाही. कारण महाआघाडी म्हणूनही पुरेसे संख्याबळ नाही. विधान परिषदेच्या पाच आमदारांची विधानसभेवर निवड झाल्याने रिकाम्या झालेल्या या जागांस

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लग्नाचे अमिष दाखवून २१ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२३ मार्च -

लोहारा तालुक्यातील एका गावात २१ वर्षीय तरुणीवर गावातीलच एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २१ मार्च २०२५ रोजी रात्री ११.१५ च्या सुमारास पीडिता आपल्या घरी असताना आरोपीने तिच्या घरात जबरदस्ती प्रवेश केला. लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतर, पीडितेच्या आई व भावास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीनुसार लोहारा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भादंवि कलम ६४(१), ६९, ११५(२), ३५२, ३५१(२), (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

संक्षिप्त वृत्त...

छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

तुळजापूर, दि.२३ मार्च -

शहरातील पूजारी नगर सोसायटी फाऊंडेशन तर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास सुरू असल्याने पूर्णाकृती पुतळ्यास दैनंदिन छत्रपती संभाजीराजे यांच्या पराक्रमाचा इतिहास शौर्यगाथा सांगत राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लब नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. याच बलिदान मास प्रसंगी पूजारी नगर सोसायटी फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पूजारी,उपाध्यक्ष उमाजी गायकवाड, सचिव अनिल आगलावे, महेश पूजारी, वंश पूजारी आदींसह सिध्दीराज कदम, विपीन शिंदे, प्रसाद पेंदे, ऋषिकेश साळुंके, अमर गायकवाड, सोनु शिंदे, किरण चिवचिवे, नितीन भांजी, धनंजय सावंत, बबलू सरवदे, प्रणव मलबा, सुदर्शन वाघमारे, राजन भांजी, आनंदी गायकवाड, नितीन सुर्यवंशी उपस्थित होते.

प्रीती देशमुख यांची प्राध्यापक पदी नियुक्ती

वाशी, दि.२३ मार्च -

वाशी येथील वसंतराव जनार्दन कवडे यांची नात प्रीती सुरेश देशमुख ही एम.एस.सी भौतिक शास्त्र या विषयासाठी असिस्टंट प्राध्यापक पदावर बारामती येथील शारदाबाई पवार कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शारदा नगर बारामती येथे निवड झाली आहे. तिचे प्राथमिक शिक्षण तसेच इयत्ता नववीपर्यंत शिक्षण जिल्हा परिषद शाळा ईट येथे झाले आहे. नंतर दहावी ते एम.एस.सी भौतिक शास्त्राचे शिक्षण त्यांनी बारामती येथे शारदाबाई पवार या कॉलेजमध्ये पूर्ण केले आहे. त्यांनी आतापर्यंतच्या पदवीधर व पदवी तर शैक्षणिक वर्षात भौतिक शास्त्र या विषयात प्रत्येक वर्षी प्रथम क्रमांक वर यश संपादन केले आहे. त्यांच्या या पुढील वाटचालीसाठी वाशी येथील ज्येष्ठ नागरिक संघटनाच्या वतीने बळीराम जगताप, बळीराम कवडे, तसेच वसंत कवडे, दादासाहेब चेडे, सुरेश गाढवे, मधुकरराव कवडे, विलासराव देशमुख, शिवाजी क्षीरसागर, बाबूशा कसबे यांनी फेटा, पुष्पहार, शाल घालून त्यांना शुभेच्छा दिल्या.

जातिवादक शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा नोंदची मागणी करत पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या आंदोलन...

काक्रंबा गावात गोमांस विक्रीच्या कारणावरुन तणाव

चार किलोमीटर पायी चालत पोलीस स्टेशनपर्यंत मोर्चा...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२३ मार्च -

तालुक्यातील काक्रंबा गावात असणाऱ्या झोपडपट्टी भागात गोमांस विक्रीसाठी धाराशिववरून आलेला रिक्षा पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला. गावात गोमांस विक्रीला मज्जाव करणाऱ्या तरुणांसोबत बाचाबाची होऊन गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. यानंतर आक्रमक झालेल्या दोन समाजातील जवळपास दोन अडीचशे महिला आणि पुरुषांनी काक्रंबा गावातून तुळजापूर पर्यंत तीन चार किलोमीटर पायी चालत घोषणाबाजी देत पोलीस स्टेशन गाठले. घोषणाबाजी देत आलेल्या या नागरिकांनी जातिवाचक शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल करा म्हणत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष तानाजी कदम यांच्या अध्यक्षतेखाली ठिय्या आंदोलन केले.

पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, अज्ञात इसम गोमास विक्री करत असलेबाबत तुळजापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार झाली असून, काल रात्री काक्रंबा गावातील ज्ञानेश्वर तुकाराम घोगरे, प्रकाश गजेंद्र झाडे, चैतन्य माने (ह.मु काक्रंबा), विराज भारत गडदे, सारंग परमेश्वर कानडे, वैभव शशिकांत बनसोडे हे दुपारी १२:३० च्या दरम्यान भिमनगर येथे येवुन गावात गोमास विक्रीला तुम्ही खात असल्याशिवाय कसं काय येतो असे म्हणून दारात बसलेल्या महिला सुनंदा सतीश चंदनशिवे, राणी अविनाश पांडगळे, राजश्री सिकंदर पांडगळे, ज्योती रविंद्र साबळे यांना शिवीगाळ करुन पुन्हा जर गावात गोमास विक्री करण्यासाठी जर कोणी आलेला दिसला तर कोणालाही जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवून गेले.

त्यानंतर घडलेला प्रकार महिलांनी मारुती चंदनशिवे संध्याकाळी सांगितल्यानंतर आम्ही रात्री ८ ते १८:३० च्या दरम्यान वरील लोकांना तुम्ही महिलांना अशी जातीवाचक शिवीगाळ का केली म्हणून विचारत असताना त्यातील विराज भारत गडदे याने या तुम्हा लोकांना लई माराव लागते. यांच्यामुळे गावात गोमास विक्री होते व यांच्यामुळे आपला धर्म भ्रष्ट होत आहे असे म्हणून ज्ञानेश्वर तुकाराम घोगरे यास खाली पाडले व ज्ञानेश्वर घोगरे याने मारहाण करण्यास सुरुवात केली.

सदरील निवेदनावर दिगंबर सिताराम मस्के यांची स्वाक्षरी आहे.

उमरग्यात युवकाला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२३ मार्च -

उमरगा तालुक्यातील कसगी गावात जुन्या भांडणाच्या कारणावरून युवकाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी उमरगा पोलिस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२२ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास कसगी येथील महात्मा बसवेश्वर चौकात फिर्यादी मल्लिकार्जुन शरणाप्पा कोळनुरे (वय ३१, रा. कसगी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांना आरोपी अर्जुन लवटे, आकाश टकले, बिरु माशाळे आणि राजेंद्र माशाळे (सर्व रा. कसगीवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून अडवले. यावेळी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी रॉड आणि बॅटने हल्ला करून त्यांना जखमी केले. एवढेच नव्हे, तर जीवे ठार मारण्याची धमकीही दिली.

याप्रकरणी मल्लिकार्जुन कोळनुरे यांनी उमरगा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपींवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास उमरगा पोलिस करीत आहेत.

दहावीच्या विद्यार्थ्यांची कल चाचणी घ्या : उमाकांत कुलकर्णी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२३ मार्च -

दहावीनंतर विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरविण्यास महत्वपूर्ण असणारी कलचाचणी गेल्या चार वर्षांपासून बंद असून ही कलचाचणी तत्काळ सुरु करण्यात यावी , अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दहावी व बारावीचे वर्ष म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा कालावधी असतो. आयुष्याला वळण मिळण्याच्या या काळातच त्यांच्या करिअरची दिशा ठरत असते. विद्यार्थ्यांचा कल , आवड कोणत्या विषयात, क्षेत्रात आहे. हे शिक्षक व पालक यांना समजून घेण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागामार्फत मोफत कलचाचणी घेण्यात येत होती.

तथापि गेल्या चार वर्षांपासून ही कलचाचणी परीक्षा बंद करण्यात आली आहे. यामुळे पालक व विद्यार्थी यांना पुढील शिक्षणासाठीचे पर्याय निवडताना अडचणी येत आहेत.

खासगी संस्थांकडून कलचाचणी करुन घेण्यासाठीचा आर्थिक खर्च सर्वसामान्य व ग्रामीण भागातील पालकांना परवडणारा नाही.

त्यामुळे यंदा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये दहावीची परीक्षा दिलेल्या सुमारे १६ लाख विद्यार्थ्यांची शिक्षण विभागामार्फत कलचाचणी घेण्यात यावी तसेच किमान दहा शाळांमागे एक याप्रमाणे समुपदेशक शिक्षक यांची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शुक्रवारी (ता.२१) निवेदनाद्वारे शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

> कलचाचणी ही मानसशास्त्रीय चाचणी असून याद्वारे विद्यार्थ्यांचा कल, आवड, व्यक्तिमत्त्व, कौशल्य, नैसर्गिक बुध्दिमत्ता, बुद्ध्यांक, स्ट्रॉंग पॉईंट, वीक पॉईंट इत्यादी बाबी समजण्यास मदत होते. दहावी नंतर पुढील उच्च शिक्षणासाठी कोणत्या ज्ञानशाखेत प्रवेश घ्यावा, कोणता पदवी अभ्यासक्रम निवडावा याबाबतच्या गोंधळातून बाहेर पडण्यासाठी कलचाचणी महत्वाची ठरते. विद्यार्थ्यांना योग्य त्या शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षणक्रमाची निवड करणे कलचाचणी मुळे सोपे जाते.
>
> **- उमाकांत कुलकर्णी**
> राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद.

तुळजापूरात 'खोक्या' साठी पारधी समाजाचे रस्ता रोको आंदोलन

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२३ मार्च -

पारधी समाजाने दि.२३ मार्च रोजी जुन्या बसस्थानका समोरील विश्वनाथ चौकात सतीश भोसले उर्फ खोक्या भाईच्या समर्थनार्थ रस्ता रोको आंदोलन केले.

सतीश भोसले याला जाणिवपूर्वक अडकण्यात येत असल्याचा आरोप पारधी समाजाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. खोक्याला प्रयागराजमधून अटक करण्यात आली. आणि वनविभागाने खोक्याचे घर वन विभागाच्या जमिनीवर असल्याचे सांगून त्याच्या घरावर बुलडोजर फिरवला. काही अज्ञातांनी त्याच्या घरातील वस्तू जाळून टाकल्या महिलांना मारहाण झाल्याचाही आरोप देखील करण्यात आला होता.

सतीश भोसले हा केवळ पारधी समाजातील असल्याने अन्यायकारकपणे अडकवले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजीतून केला. आंदोलन स्थळी तहसील कार्यालयाचे मंडलाधिकारी यांना निवेदन देण्यात आले त्यानंतर वाहतूक सुरळीत चालू झाली.

या आंदोलनात पारधी समाजाच्या महिलांसह पारधी समाज कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

कळंबमध्ये ऑप्टिकल दुकान फोडले

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२३ मार्च -

कळंब शहरातील आठवडी बाजार रोड येथे असलेल्या मैत्री ऑप्टीकल्स दुकानाचे शटर अज्ञात चोरट्याने उचकटून दुकानातील चष्मे आणि रोख रक्कम असा एकूण २८,४१५ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.२१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून ते दि.२२ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान ही चोरी घडली. फिर्यादी विष्णु श्रीमंत लांडगे (वय २३, रा. बारामाई गल्ली, केज, जि. बीड) यांनी कळंब पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि दुकानातील महागडे चष्मे व रोख रक्कम असा मिळून २८ हजार ४१५ रुपयांचा माल चोरून नेला.

याप्रकरणी कळंब पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३३१ (४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

कळंब शहरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी घराबाहेर जाताना सतर्क राहण्याचे आवाहन कळंब पोलिसांकडून करण्यात आले आहे.

२८ हजार ४१५ रुपयांचा ऐवज चोरीला

पहिलीपासून सीबीएसई अभ्यासक्रम लागू...

निर्यणाचे स्वागत करत उमरग्यात मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२३ मार्च -

उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये शासनाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली वर्गाला जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू केल्याबद्दल उमरगा येथील अशोक बनसोडे, माधव पाटील, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, मुख्याध्यापिका उपासे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शाळेतील विद्यार्थ्यांनी मिठाई वाटून या निर्णयाचे स्वागत करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी महिला व बालकल्याण कडून चालवण्यात येणाऱ्या अंगणवाडीताई मुळे, फर्जाना, प्राथमिकचे सर्व शिक्षक यांनी सहभाग घेतला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पहिलीपासून सीबीएससी करून शासनाने अनेक गरीब मुलांना न्याय मिळवून दिलेला आहे. या निर्णयामुळे ज्यांच्याकडे आर्थिक परिस्थिती नाही महागडी फीस भरून सीबीएसईच्या शाळेत जाऊ शकत नाही अशा सर्व सामान्य गोरगरीब, दीनदलित, अनाथ विद्यार्थ्यांना आता सीबीएसईचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यामुळे या निर्णयाचे स्वागत शाळेतील सर्व शिक्षकांबरोबरच पालकातून व समाजातून मोठ्या प्रमाणात होत आहे.कार्यक्रमांमध्ये अशोक बनसोडे यांनी पाच किलो मिठाई विद्यार्थ्यांना वाटून आनंदोत्सव साजरा केला.

या आनंदामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सर्व शिक्षक व पालक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

याप्रसंगी धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, सदानंद कुंभार, संजय रूपाजी, ममता गायकवाड, वर्षाराणी पाटील, सोनाली मुसळे, पुजा गुंडीले, धनराज गाडेकर, व इतर सर्व शिक्षक उपस्थित होते.

धाराशिव व कळंब शहरातील अल्पसंख्यांक भागाच्या विकासासाठी निधी द्यावा : शेख

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२३ मार्च -

धाराशिव व कळंब शहरातील अल्पसंख्यांक वस्ती असलेल्या भागांमध्ये विकासाची कामे झालेली नाहीत. त्यामुळे तो भाग अविकसित राहिलेला आहे.

त्या भागात विकासात्मक कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास अंतर्गत भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे धाराशिव कळंब

विधानसभा अध्यक्ष शौकत शेख यांनी राज्याचे अल्पसंख्यांक क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांची मंत्रालयात दि.२१ मार्च रोजी सदिच्छा भेट घेऊन केली आहे.

नळदुर्ग पोलिस ठाण्यात शांतता कमिटी बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२३ मार्च -

नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने २३ मार्च रोजी आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत आगामी काळातील सण आणि उत्सव शांततेत साजरे करण्याची अपील केली गेली. सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांनी सर्वांना पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. या बैठकीत माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी, मुश्ताक कुरेशी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले आणि अन्य प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.

बैठकीत गुडी पाडवा, रमजान ईद आणि श्रीराम जन्मोत्सवाच्या उत्सवांना शांततेत साजरे करण्याची चर्चा झाली.

यावेळी, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाईची मागणी करण्यात आली. तसेच मटका आणि जुगार बंद करण्याची मागणीही उठवली गेली.

सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड यांनी बायपास रस्त्यावर टवाळखोर युवकांच्या छेडछाडीवर कडक कारवाई करण्याची सूचना केली.

शांतता कमिटीच्या सदस्यांनी सर्व सण आणि उत्सव डॉल्बी मुक्त साजरे करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीत करण्यात आलेल्या मागण्या लवकरच तात्काळ कार्यवाहीसाठी पोलिस प्रशासनाकडे पाठवण्यात आल्या आहेत.

टीबी हारेगा, इंडिया जीतेगा या मोहिमेसाठी नेते विरुद्ध अभिनेते यांच्यात रंगला क्रिकेट सामना

सामान्यात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचाही सहभाग....

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२३ मार्च -

'टीबी मुक्त भारत' या महत्वाकांक्षी अभियानाच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या पुढाकाराने मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुल (BKC) येथील एमसीए क्रिकेट मैदानावर विशेष क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले.

या सामन्यामध्ये नेते संघाकडून धाराशिव लोकसभा मतदार संघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सहभागी होत फलंदाजी व गोलंदाजीचा आनंद घेतला. 'नेते' विरुद्ध 'अभिनेते' अशा दोन संघांमध्ये खेळवण्यात आलेल्या या रोमांचक सामन्यात अभिनेता संघाने विजय मिळवला.

सामना अत्यंत अटीतटीचा झाला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजी करत सामना रंगतदार केला. अखेरच्या षटकात अभिनेता संघाने शानदार कामगिरी करत नेते संघावर विजय मिळवला.

या सामन्यात खेळाडूंनी क्रिकेटच्या माध्यमातून क्षयरोगाविषयी जनजागृती करण्याचा संदेश दिला.

या विशेष सामन्याच्या निमित्ताने क्षयरोग निर्मूलन मोहिमेस चालना देण्याचा उद्देश होता. उपस्थित मान्यवरांनी आणि खेळाडूंनी 'टीबी मुक्त भारत' या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. समाजात क्षयरोगाविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि लोकांनी वेळीच उपचार घ्यावेत, यासाठी अशा उपक्रमांचे महत्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या उपक्रमामुळे टीबी मुक्त भारताच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शिवराज्याभिषेक सोहळा समिती वतीने शहीद दिन साजरा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२३ मार्च -

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने दि.२३ मार्च १९३१ रोजी हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या विवेकी क्रांतिकारी भगतसिंग आणि त्यांचे दोन क्रांतिकारी साथीदार सुखदेव थापर आणि शिवराम हरी राजगुरू यांना सँडल्सच्या वधाच्या कारणाने फाशीची शिक्षा देण्यात आली होती.

भारत मातेच्या या महान सपूतांच्या हौतात्म्याने भारतीयांच्या मध्ये क्रांतीची ज्योत प्रज्वलित झाली होती.या हौतात्म्य पत्करलेल्या महान क्रांतिकारकांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

तसेच दि.२३ मार्च १९८२ रोजी मराठ्यांना आरक्षण मिळाले नाही तर मी उद्याचा सूर्य पाहणार नाही अशी पाच लाख लोकांसमोर शपथ घेऊन ती पूर्ण करणारे, मराठा महासंघाचे संस्थापक, लाखो माथाडी कामगारांचे कैवारी, मराठा आरक्षणाचे संकल्पक, मराठ्यांचे क्रांतीसुर्य स्वं. आण्णासाहेब पाटील यांनी समाजासाठी बलिदान दिले काही अण्णासाहेब पाटलांच्या बलिदानाच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

अण्णासाहेब पाटलांचे मराठा आरक्षण आणि माथाडी कामगारांसाठी केलेले अतुलनीय कार्य त्यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले. शाहिद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्याविषयी शहर समिती सोशल मीडिया प्रमुख ऋषिकेश काळे यांनी संपूर्ण सँडल्स वधाचा घटनाक्रम तसेच भगतसिंगाचे संपूर्ण जीवन प्रवास त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व ओघवत्या वाणीने उपस्थितांना सांगून अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

बेकायदेशीर नोकर भरती, पोषण आहार घोटाळ्यावर पांघरुण घालण्यासाठी खोटा गुन्हा दाखल

राधिका श्रीराम सोळुंके यांचा आरोप... शिवाजी शिक्षण संस्थेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर...

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.२३ मार्च -

शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना आम्ही मारहाण केली नसून शाळेतील पोषण आहार घोटाळा व विद्यालयातील बेकायदेशीर कर्मचारी भरतीचे बोगस प्रकरण दडपण्यासाठी आमच्यावर खोटा गुन्हा दाखल झाला असल्याचे आरोप राधिका श्रीराम सोळंके यांनी केले आहे.

कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांना विश्वासात न घेता उपाध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापिका दिपश्री जाधव यांनी संगणमत करून शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविध शाळेत लाखो रुपये घेऊन बेकायदेशीर नोकर भरती केली आहे.

या मनमानी कारभारीची चौकशी करून मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना निलंबित करावे, अशी मागणी राधिका श्रीराम सोळुंके यांनी निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. शहरातील नाम ांकित अशा शिवाजी विद्यालयातील कर्मचाऱ्यातील वादामुळे शिवाजी शिक्षण संस्थेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहे.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना राधिका सोळुंके म्हणाल्या शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना माझे आजोबा माजी आमदार कै. श्रीपतराव सोळुंके यांनी केली आहे. माझी या संस्थेत २०१७ साली लिपिक पदावर नियुक्ती झाली असताना विद्यमान मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांनी शासनाकडे माझा प्रस्ताव न पाठवता दुसऱ्याचा प्रस्ताव पाठवून मान्यता घेत आहेत. याबाबत मी विचारणा करण्यासाठी गेले असता मला व माझ्या आईला मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली व तू कोण आहेस मी ओळखत नाही म्हणून शाळेच्या बाहेर हाकलून दिले.

मुख्याध्यापिकेने विद्यमान कार्यकारी मंडळाला डावलून उपाध्यक्ष दत्ता सोमवंशी व सचिव बंडाप्पा काळगे यांच्या सल्ल्याने त्या मनमानी कारभार करत आहेत. अशाच पद्धतीने त्यांनी पैसे घेऊन तीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त केले आहेत.

त्या प्रकरणाची सुनावणी शिक्षण विभागाकडे सुरू आहे. माझ्या नियुक्तीला शिक्षणाधिकारी यांनी मान्यता न दिल्यामुळे मी न्यायालयात गेले आहे. न्यायालयाने शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापिका यांनी निर्णय घेण्याचे सांगितले आहे.

माझ्यावर माझ्या आईवर खोटे आरोप करून खोटे गुन्हे दाखल केले आहेत. याची सखोल चौकशी करून उपाध्यक्ष व सचिवाच्या सांगण्यावरून मनमानी कारभार करणाऱ्या मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना निलंबित करावे अशी मागणी राधिका श्रीराम सोळुंके यांनी केले आहे.

संक्षिप्त वृत्त...

उदयगिरीत शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना अभिवादन

उदगीर, दि.२३ मार्च -

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात शहीद दिनाच्या निमित्ताने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतीकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, आयआयटी गुवाहाटी येथील प्रा. प्रशांत पाटील, ग्रंथपाल डॉ.एल.बी. पेन्सलवार, दिनविशेष समिती प्रमुख डॉ. जी.जी. जेवळीकर, प्राध्यापकवृंद, विद्यार्थी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

छत्रपती महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त हुतात्यांना अभिवादन

उदगीर, दि.२३ मार्च -

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त हुतात्मा भगतसिंग, राजगुरु, सुखदेने यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांच्या मार्गदर्शनानुसार शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा.एच.ए. तिरपुडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.एस.डी. सावंत, प्रा.डॉ डी.बी. मुळे, प्रा.डॉ. चाटे, प्रा. पावडे शुभांगी, वळवी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समितीचे सहसंयोजक डॉ.डी.बी. मुळे यांनी केले व आभार प्रा. शुभांगी पावडे यांनी मानले.

धाराशिव शहर वाहतूक शाखेची कारवाई

धाराशिव, दि.२३ मार्च -

शहरातील वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली. २२ मार्च रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक नियम भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध एकूण २२४ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईत वाहनचालकांकडून २,३४,००० रुपये तडजोड शुल्क म्हणून वसूल करण्यात आले.

डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी सतिष गायकवाड, सचिव मारोती गायकवाड

तभा वृत्तसेवा
चाकूर, दि.२३ मार्च -

चाकूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी सतिष

गायकवाड तर सचिव पदी मारोती गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या निवडीची बैठक येथील नालंदा बौद्ध विहार येथे रंगनाथ वाघमारे, सूर्यकांत कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून सतिष गायकवाड, उपाध्यक्ष पंढरीनाथ कांबळे,सचिव मारोती गायकवाड, सह उपाध्यक्ष शुभम गायकवाड, सहसचिव संग्राम वाघमारे, कोषाध्यक्ष किशोर महालिंगे, सह कोषाध्यक्ष हणमंत कांबळे,मि रवणूक प्रमुख विक्की महालिंगे, प्रसिद्धी प्रमुख रितेश महालिंगे, सह प्रसिद्धी प्रमुख सौरव गायकवाड, सजावट प्रमुख माधव कांबळे, सह सजावट प्रमुख निखिल सूर्यवंशी आदीची निवड करण्यात आली.

दरम्यान बैठकीत सार्वजनिक जयंतीचे नियोजन घेण्यात आले.सामाजिक उपक्रम यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला दिलीप महालिंगे, बलभीम महालिंगे, संदीपान वाघमारे, विद्यासागर गायकवाड, पपन कांबळे, प्रभाकर गायकवाड, तुकाराम भालेराव, अनिल महालिंगे, सचिन चाकूरकर, नरेश गायकवाड, गोपीनाथ कांबळे, वर्धमान कांबळे आदीजण उपस्थित होते.

जेथील माळी चांगला तेथील बाग चांगली फुलते : कवी योगीराज माने

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न...

तभा वृत्तसेवा
निलंगा, दि.२३ मार्च -

आज कालची तरुण पिढी फार वाहत चालली आहे असे म्हटले जाते. परंतु या तरुण पिढीला योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी चांगल्या मार्गाला लागतात. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२३ २४ च्या गुणवत्ता यादीत महाराष्ट्र महाविद्यालयाचे १४ विद्यार्थी चम कलेत. याचा आनंद तर आहेच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली सुप्त कलागूण स्नेहसंम ेलनाच्या निमित्ताने समोर येतात. त्यांच्या कलागुणांना संधी प्राप्त करून दिली जाते. यासाठी जेथील माळी चांगला तेथील बाग चांगली फुलते, बहरते, असे मत सुप्रसिद्ध कवी, गीतकार योगीराज माने यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र म हाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंम ेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की आयुष्य हे फार धावपळीचे झालेले आहे. लग्नानंतर सर्वांचे आयुष्य बदलून जाते. म्हणूनच लग्नाआधी एक तरी हसरा फोटो काढून ठेवावा आपणही कधीतरी हसत होतो त्याचा पुरावा असू द्यावा. या काव्यातून त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आपल्या ठेवणीतल्या लोकप्रिय अशा आई, बाप माझा, घर, लवस्टोरी, लेक यासारख्या कवितांचे गायन करून उपस्थित विद्यार्थ्यांची मने जिंकली. महाविद्यालयात कला, विज्ञान, वाणिज्य संगनक शास्त्र, बी. होक, शाखेतून विविध विषयात प्रथम आलेल्या व विद्यापीठातून गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ यांनी भूषविले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. भास्कर गायकवाड यांनी करून दिला. विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके, मोरेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आर.डी. कांबळे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. हंसराज भोसले यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी व कमल गोमसाळे यांनी केले.

सद्गुरु उदागिर बाबा महाराजांच्या उत्सवास प्रारंभ; सपत्नीक रुद्रअभिषेक व विनापुजन

तभा वृत्तसेवा
उदगीर, दि.२३ मार्च -

श्री सद्गुरु उदागिर बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांच्या हस्ते सपत्नीक रुद्रअभिषेक व ज्ञानेश्वरी पारायण ग्रंथपुजन व विनापुजन करुन उदागिरी बाबा महाराज उत्सवास प्रारंभ झाला.

उदगीरच आद्यदैवत श्री सद्गुरु उदागिरी बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि. २२ मार्च रोजी पहाटे ५ वाजता उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांच्या हस्ते सपत्नीक उदागिर बाबा महाराजांच्या सम ाधीस रुद्रअभिषेक व महाआरती करण्यात आली व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजन, विनापुजन

करुन पारायण व हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ झाला.

उदागिरी बाबा मठ संस्थानच्या वतीने मठाधिश जयेशगिर गुरु सतिशगिर महाराज यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व स्वाती दाभाडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. दररोज पहाटे ४ ते ६ उदागिर महाराज महारुद्र पुजा ७ ते १० सामुहिक श्रीज्ञानेश्वरी पारायण, १२ ते २ तुकाराम गाथा भजन, २ ते ४ महिला भजन, ४ ते ६ प्रवचन, ६ ते ९ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन व जागर आदि कार्यक्रम होणार आहेत. तर प्रवचन व किर्तन यात २२ मार्च रोजी हभप. रामकिशन महाराज शिरोळकर यांचे प्रवचन तर हभप. एकनाथ महाराज श्रीडोळे यांचे किर्तन.

रविवार दि.२३ रोजी हभप. मुकुंद महाराज नागलगाव यांचे प्रवचन तर हभप. दामोधर गिरी महाराज हांदीखेर यांचे किर्तन सोमवार दि.२४ मार्च रोजी सुरेश पाटील नेत्रगावकर यांचे प्रवचन व किर्तन, मंगळवार दि.२५ रोजी हभप. उद्धवम हाराज हैबतपुरे यांचे प्रवचन तर हभप. संदिप महाराज होळीकर यांचे किर्तन

बुधवार दि. ६ एप्रिल रोजी हभप. राजयोगी सतीशभैय्या डिगोळकर यांचे प्रवचन तर हभप. प्रशांत महाराज क्षीरसागर यळम घाट यांचे किर्तन.

गुरुवार दि.२७ मार्च रोजी हभप. रघुवीर महाराज हेळंबकर यांचे प्रवचन व किर्तन, शुक्रवार दि.२८ रोजी हभप. ज्ञानोबा कारभारी बोंबळीकर यांचे प्रवचन व किर्तन होणार आहे.

शनिवार दि.२९ मार्च रोजी सकाळी १० ते १२ हभप. गोरखगीर महाराज धोंडीहिप्परगेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. मध्यरात्री बारा वाजता उदागीर बाबा मंदिर ट्रस्टच्या वतीने महापुजा होणार असुन यानंतर भक्तांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

रविवार दि. ३० मार्च २०२५ रोजी गुडी पाडव्यानिमित्त प्रतिवर्षा प्रमाने श्री सद्गुरु उदागिर बाबा उत्सवानिमि त्त ३० मार्च रोजी सकाळी ९ ते ३ या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

गुडी पाडव्या निमित्य सकाळी ९ वाजता भक्ती संगीत कार्यक्रम संपन्न होणार आहे.

विदयानिकेतन विद्यालयाच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात दोनशे विद्यार्थ्यांनी नोंदवला प्रवेश

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२३ मार्च -

येरमाळा येथील विद्यानिकेतन प्री- प्रायमरी स्कूलमध्ये इयत्ता पहिलीसाठी प्रवेश वाढवा या संकल्पनेतुन प्रवेशोत्सव कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष सचिन पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सतिष पाटील व प्रविण बारकुल हे उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष सचिन पाटील यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. आणि आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी योग्य शाळेची निवड कशी करावी, याविषयी माहिती दिली. त्यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सतीश पाटी, तुषार रुमणे, म नोज जाधवर, प्रवीण बारकुल, संदीप ढवळे, आश्विनी बारकुल, सुनीता बारकुल, वाघमारे आणि प्रशासकीय अधिकारी अनिल डोके आदी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून शाळेच्या शिक्षण प्रणालीबद्दल समाधान व्यक्त केले आणि पालकांना शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाळवदे यांनी केले.

शेतकरी नवरा नको गं बाई... पण शेती पाहिजे

- मुलगा तर हवा पुण्यातच...
- मुलीच्या भावी पतीकडून अपेक्षा...
- ३५ वय ओलांडलेल्या अनेकांचे लग्न लांबणीवर...

तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक
रेणापूर, दि.२३ मार्च -

मुलगा शासकीय नोकरदार असावा. सासू सासरे जवळ नसावेत. किमान चार ते पाच वर्षाचे दोघांच्या वयात अंतर असावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलगा शहरात राहणारा असावा. अशा एक ना अनेक अपेक्षा घेऊन बसलेल्या मुली आणि मुलीच्या पालकामुळे अनेक मुलांची लग्न जुळत नसल्यामुळे ही लांबणीवर पडत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.



दरम्यान समाजात मुलींची संख्या कमी असल्याने अनेकांची लग्न जमत नसल्याचे सांगण्यात आले आहे. प्रत्येक आई-वडिलांना आपली मुलगी सुखी घरी नांदावी अशी अपेक्षा असते. नोकरी जाब असणाऱ्या मुलांना अधिक पसंती दिली जात आहे. मात्र गरीब अथवा श्रीमंत शेतकरी मुलाला मुलगी देण्यास मुलीचे आई-वडील राजी होत नाहीत. कोरोनाच्या संकटामुळे अनेक तरुण शहरातून गावात आले. काही तरूण पुन्हा शहरात परत गेले.

मुलीच्या शोधातील मुलगा...

माझे शिक्षण एम.ई. झाले आहे. मी पुण्यात चांगला जॉब करतो. पण मला म्हणावी तशी मुलगी मिळतच नाही. खूप प्रयत्न केले. वधु वर सुचक केंद्र जॉईन केले. येथेही मेळ लागत नाही. कोणी मुलगी देता का मुलगी असे म्हणण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

मात्र कोरोनाच्या काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्याने बरेच तरुण खेडेगावात रम ले.

सध्या मुलींची संख्या कमी असल्याने तरुणांची लग्न जुळणे कठीण झाले आहे. परिणामी उपवर मुलांच्या वडिलांची दम छाक होत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

शेतकरी मुलावर वाईट दिवस...

एकीकडे बेकारी, दुष्काळ, अतिवृष्टीने संकटात टाकलेल्या शेतकऱ्यांना आता मुलीही संकटात टाकत आहेत. शेती करणाऱ्या मुलाला मुलगी देण्यात ९० टक्के पालक होकार देत नसल्याचे सांगण्यात येत आहे. शेकडो एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाही मुलाला मुलगी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे.

एकत्रित कुटुंब नको ग बाई...

पूर्वी एकत्रित कुटुंबाला मुली सर्वाधिक पसंती देत होत्या. मात्र अलीकडच्या काळात शिकल्या सवरलयां मुलींना आता एकत्रित कुटुंब पद्धती नकोशी झाली आहे. नवरा कामाला मुलगी कामाला पैसे कमवायचे जीवन जगायचे एवढे जीवन मुलींचे झाले आहे. त्यामुळे अनेक मुली सासू-सासरे जवळ नको. मूलबाळ लवकर नको, अशी मागणी आपल्या भावी पती समोर करीत आहेत.

लग्न थांबण्याची कारणे...

मुलींना शासकीय नोकरदार, मेट्रोसिटीत राहणारा पती हवा आहे. एकत्रित कुटुंब नको, सासू सासरे जवळ नको, मुलगी बी.ई. असेल तर मुलगा एम.ई. हवा आहे. शेतकरी मुलाला ९५ टक्के टक्के मुली नकार देत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

नांदेड जिल्हा विकासाच्या प्रवाहात आणू

नरसी येथिल पक्ष प्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन

तभा वृतसेवा
नायगाव, दि. २३ मार्च

मराठवाड्यातील नांदेड जिल्हा हा मला विकासाच्या प्रवाहात आणून दाखवेन आज विरोध जरी राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे असे जरी म्हणत असले तरी मी राज्याचा अकरा वेळा अर्थसंकल्प सादर करणारा एक व्यक्ती आहे उलट त्याचबरोबर येथील शेतकऱ्यांत आर्थिक सुबत्ता आली पाहिजे त्या साठी आता थोड्याच दिवसात राज्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असलेला तूम्हाला पाहायला मिळेल असे असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.नरसी येथील पक्ष प्रवेश सोहळ्यात ते बोलत होते.

या सोहळ्यात जिल्ह्यातील जेष्ठ नेत्यांपैकी एक गणल्या जाणारे व अखिल भारतीय काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगांवकरांनी राज्यांतील उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र राज्याचे प्रांतध्यक्ष सुनील तटकरे, राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री नवाब मलिक,आमदार संजय बनसोडे,यांच्या उपस्थितीत आपले कट्टर समर्थक माजी आमदार अविनाश घाटे, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा माजी जि.प.सदस्य डॉ.मिनल ताईसह नायगांव तालुक्यासह बिलोली,देगलूर मधील आजी-माजी नगरसेवक, सरपंच खतगांवकर हित चिंतकांसह अनेक कट्टर समर्थकांनी नरसी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात यावेळी जाहीर पक्ष प्रवेश केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवेश सोहळ्या प्रसंगी सर्व प्रथम राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पअर्पण करीत दिपप्रज्वलन करून महाराष्ट्र गीताने पक्ष प्रवेश सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.तद्नंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांचा भास्करराव पाटील खतगावकर व डॉ. मिनल ताई खतगांवकर यांच्या सकारत्मक उर्जे चा प्रतीक असलेला खोबरा हार घालून यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले कि, राज्यातील आघाडी सरकार मधील राष्ट्रवादी पक्ष घटक पक्ष आहे राज्यातील शेतकरी व सर्व सामान्यांच्या हितांचे जर हा पक्षाचा जिल्ह्यात एक आमदार जरी आसलो तरी आता नव्यानेच जिल्ह्यातील मुरब्बी राजकारणी म्हणून परिचित असलेले भास्करराव पाटील खतगावकर हे आता माझ्या जोडीला असुन उद्याच्या होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत मी आणि भास्करराव पाटील खतगावकर व आमच्या पक्षातील प्रमाणिक मावळ्यांच्या बळावर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेवर झेंडा फडकविल्या शिवाय राहणार नाही असे जाहिर आवाहन प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले.

जिल्ह्याचे मुरब्बी राजकारणी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर म्हणाले कि गेल्या काही अनेक वर्षापासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणारे पाण्याचा मानणार धरणातील प्रश्न आहे लेंडी धरणाच्या प्रश्नः यासारखे प्रश्न प्रलंबित आहेत त्यासाठी ते फक्त आपला पक्ष आपल्या माध्यमातूनच तूम्ही सोडवू शकता अशी मागणी करीत आपल्या स्नुषा व माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. मिनल ताईना तूमच्या दोन समान तूमची मूलगी म्हणून तूमच्या कडे सोपवितो व ती तूमच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्य उल्लेखनीय करेल असा विश्वास यावेळी बोलून दाखवला.

'शाहू'ची गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड

तभा वृतसेवा
भोकर, दि. २३ मार्च

येथील 'श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया'ची गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड झाली असून संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी ही बाब अतिशय आनंदाची व अभिमानाची आहे. विशेष म्हणजे यंदाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२' मध्ये शाळेला विभागीय पातळीवर पारितोषिक मिळाले आहे. ऑक्टोबर महिन्यात मुंबई येथे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, राज्याचे शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आदींच्या हस्ते शाळेला पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला होता.

जळगाव येथील 'महात्मा गांधी रिसर्च फाउंडेशन' ही एक सुविख्यात संस्था असून या संस्थेतर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात येते.

महाराष्ट्रातील सर्व शाळांमधून यंदा 'शाहू'ची अंतिम फेरीत निवड झाली असून या प्रतिष्ठेच्या सन्मानासाठी नामांकन मिळणं ही बाब भूषणावह आहे. त्यासाठी श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव शिरिषभाऊ देशमूख गोरठेकर, संचालक कैलासभाऊ देशमूख गोरठेकर, प्राचार्य संजय देशमुख कामनगावकर, संस्थेचे विविध पदाधिकारी, पत्रकार आदींसह सर्व स्तरांतून 'शाहू परिवारा'वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संक्षिप्त वृत्त

सांस्कृतिक कार्य विभागाची सांस्कृतिक मानवंदना

नांदेड-चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाने सांगितिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन २२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता केले होते. चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वसंत बहार या सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची असून मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाची निर्मिती झाली आहे. या कार्यक्रमात ख्यातनाम कलावंत सहभाग घेतला. संगीत संयोजन आनंदी विकास तर संवाद निरजा आपटे, देविदास फुलारी यांचा होता. ख्यातनाम गायक गायिका सागर जाधव, शेफाली कुलकर्णी, विश्वास अंबेकर, मीना सोलापूरे, आसावरी रवंदे या कलाकारांच्या कला सादरीकरणातून तसेच मुर्तिकार व्यंकट पाटील यांच्या सादरीकरणातून चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या स्मृतीला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहसंचालक श्रीराम पांडे यांनी केले.

बहुजन सेवा संघाच्या वतीने ॲड. परमेश्वर गोणारे यांचा सत्कार

नांदेड-ऑल इंडिया बार एक्झाम परीक्षेमध्ये परमेश्वर गोणारे हे नुकतेच उत्तीर्ण झालेले असून या अनुषंगाने त्यांचा बहुजन सेवा संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष माननीय मनीष भाऊ कावळे यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला यावेळी बहुजन सेवा संघाचे केंद्रीय सदस्य सखाराम मामा इंगोले तसेच जिल्हा कार्यकारणी सदस्य माननीय भीमरावजी सातोरे तसेच कर्मचारी शाखेचे सदस्य गौतमजी भंडारे तसेच सेवा संघाचे कार्यालयीन सचिव नारायणराव घुले आदी कार्यकर्ते उपस्थित होते. ॲड. परमेश्वर गोणारे हे ऑल इंडिया बार एक्झाम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्यामुळे आदिवासी कोळी समाज तथा संपूर्ण बहुजन समाजामध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे निश्चितच त्यांच्या कायदेशीर ज्ञानाचा फायदा व लाभ बहुजन समाजाला मिळणार आहे.

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची इब्राहीमबेग पटेल निवासस्थानी भेट

नरसी-महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे २३ मार्च रोजी रविवारी नायगांव तालुका दौ-यावर आले असता नरसी येथील पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन विवीध विषयावर संवाद साधला याप्रसंगी अहमदपूर येथील मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल जहागीरदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा नरसीच्या वतीने पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल यांनी कौटुंबिक सत्कार केला. याप्रसंगी सपोनि श्रीधर जगताप, उपसरपंच प्रतिनिधी अलीम बेग पटेल, उद्योजक मोबीन पटेल, वसीम बेग पटेल, नयूम पटेल, अस्लम बेग पटेल, गौसमामू, सय्यद पीररसाब आदींची उपस्थीती होती.

'स्वारातीम' विद्यापीठामध्ये शहीद दिनानिमित्त अभिवादन

नांदेड-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि.२३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, रवींद्र गुर्जर, शितल कोकाटे, शिरीष सहस्रबुद्धे, नारायण हरळीकर, शामराव जोशी, विलास पोतदार, पराग लोणकर, सुनील करमरकर, तनुजा शाह, आदित्य हर्डीकर, जयश्री बोकील, सुप्रिया गोडबोले, सुचिता नांदापूरकर फडके, सायली धोंगडे, म. इ. तंगावार, सुरश्री जोशी, अनघा नाटेकर, रवींद्र अभ्यंकर, दाक्षायणी पंडित, संपदा पाटगावकर, विकास साटम, रत्नाकर रेगे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, रामदास खोकले, गोपिराज हंबर्डे, मारोती कदम, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दलित साहित्याने मला जगण्याचा सन्मान दिला : दत्ता भगत

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि. २३ मार्च

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने दिनांक २२ मार्च २०२५ रोजी दलित साहित्य जागतिक परिप्रेक्ष्य (Dalit literature a perspective) आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन दत्ता भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या याप्रसंगी बोलताना म्हणाले की दलित साहित्यांनी माला जगण्याचा सन्मान दिला .यार्चासत्रात देश विदेशातील अभ्यासकानी दलित किंवा आंबेडकरी

साहित्य या विषयावर मार्गदर्शन केले.

स्वारातीम विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने दलित साहित्य : जागतिक परिप्रेक्ष्य या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात आपले मनोगत व्यक्त करताना दत्ता भगत म्हणाले की मी तसा एका शैक्षणिक कुटुंबाचा भाग होतो; माझे आणि यापरिसराचे जिव्हाळ्याचे नाते होते त्या सर्व माझ्या स्मृती जागी झाल्या. या व अशा अनुभवातून मला जगण्याचा सन्मान मिळाला.

दलित किंवा आंबेडकरी साहित्य हा आधुनिक भारतीय साहित्यातील एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह आहे सामाजिक व वांग्मयीन अशा दुहेरी विचार मंथनातून स्वातंत्र्योत्तर काळात ही संज्ञा पुढे आली. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या कार्यक्रम आयोजक डॉ.पी.विठ्ठल यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. विठ्ठल यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र गोणारकर व डॉ.राजपालसिंग चिखलीकर यांनी केले.सदरील कार्यक्रम यशस्वीरित्या पारपाडण्यासाठी डॉ. शिवराज मंगनाळे, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. सविता पाटील, संदिप एडके,काळबा हनवते, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. संदीप जाधव, डॉ. प्रशांत घोडवाडीकर, प्रदीप बिडला, स्वप्नील नरबाग, प्रकाश दीपके, सतिश वागरे, सचिन खडके, गजानन इंगोले, संभा कांबळे, बालाजी शिंदे, विशाल कंधारकर, प्रकाश तारू, विजय पांगरीकर, शशिकांत लोहबंदे, जनार्दन गवंदे, नरसिंग कागडा, शेख रशीद, ऋतुराज बुक्तरे, ढोले आदींनी परिश्रम घेतले.

जम्मू-कश्मीर मधील स्थित्यंतराचा अभ्यास आवश्यक : गिरीधर मामेडी

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि. २३ मार्च

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र संकुलाद्वारे जम्मू व काश्मीर येथील कलम ३७० हटविल्यानंतर झालेल्या सामाजिक, आर्थिक स्थित्यंतराच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय परिषदेचे दि. १९ ते २१ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. पीएम उषा अंतर्गत या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संशोधक विद्यार्थी, अभ्यासक यांनी सहभाग नोंदवून शोधनिबंधांचे वाचन केले.

आंतरविद्याशाखा अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. बाविस्कर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. काश्मीर विषयक प्रश्नांचे अभ्यासक

गिरिधर मामेडी हे उद्घाटक व बीजभाषक म्हणून उपस्थित होते. दीप प्रज्वलन व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला अभिवादन करून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. कलम ३७० विषयक प्रश्न हे केवळ राजकीय प्रश्न नसून लोकशाही देशाची प्रादेशिक अखंडता सामाजिक सांस्कृतिक ऐक्य आणि जम्मू कश्मीर मधील जनतेच्या विकासाशी संबंधित होते म्हणून अडथळ्याच्या स्वरूपातील हे कलम हटविणे हे आवश्यक होते असे प्रतिपादन गिरीधर मामेडी यांनी व्यक्त केले. तसेच सर्व भारतीय नागरिकांनी काश्मीरला भेट देऊन तेथील परिस्थितीचा सकारात्मक अनुभव प्रत्यक्षपणे घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जम्मू काश्मीरचा प्रश्न हा विशिष्ट प्रदेशाचा राजनैतिक प्रश्न नसून त्याचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अनुबंध लक्षात घेता त्या सर्वांचा आंतरविद्याशाखीय अभ्यास शैक्षणिक दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊनच या परिषदेच्या आयोजन करण्यात आल्याचे डॉ. सिंकू कुमारसिंह यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पष्ट केले.

जम्मू कश्मीर विषयक या प्रकारच्या चर्चेमुळे केवळ राजकारणाभिमुख चर्चा व माध्यमांच्याद्वारे प्रस्तुत असे एवढ्यावरच मर्यादित न राहता योग्य प्रकारची जागरूकता, माहिती नवीन ज्ञान व धोरण निर्मितीच्या दृष्टीने समोर येईल असे मत अध्यक्षीय समारोपात डॉ. बाविस्कर यांनी व्यक्त केले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात अभ्यासक विनयसाठी चाटी यांनी कलम ३७० च्या कायदेविषयक बाजू त्या दूर करण्याची आवश्यकता व पर्यायी तरतुदी या सर्वांची मांडणी विशेष व्याख्याना द्वारे सादर केली. परिषदेच्या आमंत्रक डॉ. वैजयंता पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

उमरी ते शिर्डी पदयात्रेचे नांदेडमध्ये आगमन

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २३ मार्च

संत श्री दासगणू महाराज यांच्या कृपा आशीर्वाद लाभलेल्या उमरी ते शिर्डी पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून काल रविवारी यात्रेचे नांदेड शहरात आगमन झाले. विविध सामाजिक धार्मिक संस्थांनी ठिक ठिकाणी उत्स्फूर्त असे स्वागत करण्यात आले.

मराठवाड्यातुन मानाची असलेली उमरी ते शिर्डी ही पदयात्रा पालखी स्वरूपात असून मागील १४ वर्षापासून यात्रेचे आयोजन करण्यात येते. आनंदी दास देशमुख यांनी बाबा टायर्स येथे साईं पालखीचे पुष्पवृष्टी करून मोठे स्वागत केले...चहा, बिस्कीट अल्पोपहार देऊन आशीर्वाद घेतला. दरम्यान यात्रा झुलेलाल बाबा मंदिर येथे नतमस्तक झाली. वाजेगव येथे खा रवींद्र चव्हाण यांनी यात्रेला भेट दिली. यात्रेचे त्यांनी स्वागत केले. शिवाजीनगर येथील श्री हनुमान मंदिर येथे पालखीची आरती करण्यात आली, स्वागत झाले. साई भक्त तथा नांदेड मर्चंट को ऑपरेटिव्ह सहकारी बँकेचे अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते व नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे यांच्या वतीने यात्रेचे अध्यक्ष गोपाल राठोर, कार्यकारी अध्यक्ष अशोक मामीडवार, उपाध्यक्ष महेश नग्गूरवार (हुंडेकर), कृष्णा देशमुख,संदीप लापशेतवार यांचे प्रातिनिधिक स्वागत केले. जवळपास पंधरा दिवस चालणारी ही पदयात्रा रामनवमीच्या दिवशी शिर्डी येथे दाखल होणार आहे. शिर्डी येथे शिर्डी संस्थानच्या वतीने यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात येते. श्री संत कवी दासगणु महाराज साई भक्त मंडळ गोरटे संचलित पालखीत जवळपास सव्वाशे भाविक भक्त सामील झाले आहेत.

नांदेड-काँग्रेस अल्पसंख्याक विभाग प्रदेश उपाध्यक्ष मसूद अहेमद खान यांच्यावतीने न्यू फेमस फंक्शन हॉल येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खा. रविंद्र पाटील चव्हाण, आयोजक मसूद अहेमद खान, शेर अली, अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्षरहिम खान, शमीम अब्दुला, सुरेश गायकवाड, अलीम खान, सुभाष रायबोले, तिरुपती पा. कौंढेकर, संदिप सोनकांबळे, सुरेंद्र घोडजकर, गंगाधर सोनकांबळे, आदीसह मुस्लीम बांधव मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नांदेड विमानतळावर स्वागत

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २३ मार्च

महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांचे आज एक दिवसाच्या दौऱ्यासाठी श्री. गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री नवाब मलिक यांचेही आगमन झाले.

यावेळी त्यांचे आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार राजू नवघरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.

मनोहर चासकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, राज्य उत्पादन शुल्कचे नांदेड विभागाचे विभागीय उपायुक्त डॉ. बी.एच.तळवी, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर आणि विविध पदाधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यामधील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी ते नांदेड जिल्ह्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत.

जागतिक वन दिनानिमित्त किनवट येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

तभा वृतसेवा
किनवट, दि. २३ मार्च

दि. २१ मार्च २०२५ रोजी जागतिक वन दिनानिमित्त किनवट परिसरात सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड आणि वनविभागाच्या वतीने विविध ठिकाणी पर्यावरण संरक्षण आणि जनजागृतीसाठी कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये शैक्षणिक सहल, रॅली आणि धनादेश वाटप यांचा समावेश होता. या कार्यक्रमांनी वनसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला.

मौजे कंचेली येथे रॅली आणि धनादेश वाटप

मौजे कंचेली येथे आयोजित कार्यक्रमाला उपवनसंरक्षक केशवजी वाबळे, सहायक वनसंरक्षक श्रीकांत इटलोड आणि वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) उमेश ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. वनरक्षक आणि वनपाल, शिवणी, आप्पारावपेठ यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एक भव्य रॅली काढली. या रॅलीद्वारे वनसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यात आला. विद्यार्थ्यांनी घोषणांच्या माध्यमातून जागरूकता निर्माण केली.

या प्रसंगी शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीसाठी मंजूर झालेल्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. वनविभागाच्या या

पुढाकाराने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, उपवनसंरक्षक वाबळे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे वनरक्षक आणि वनपाल यांच्या युनिफॉर्मसाठी मंजूर झालेल्या धनादेशांचेही वाटप कर्मचाऱ्यांना करण्यात आले. ज्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. वाबळे यांनी मार्गदर्शन करताना वनसंवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांचे आवाहन केले आणि वनविभाग शेतकरी व कर्मचारी कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

बेंदी तांडा येथे शैक्षणिक सहल आणि वन भ्रमंती सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांच्या वतीने विभागीय वनाधिकारी श्री. संदीप बाबू चव्हाण आणि सहायक वनसंरक्षक सौ. शुभांगी लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली बेंदी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील सुमारे ४० विद्यार्थ्यांसाठी पैनगंगा अभयारण्यात शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत विद्यार्थ्यांनी वन भ्रमंती (सफारी)चा आनंद घेतला आणि जंगलांचे महत्त्व, वन्यजीव संरक्षण, तापमानवाढीचे दुष्परिणाम आणि वृक्षलागवडीचे फायदे याबाबत माहिती मिळवली.

संदीप चव्हाण यांनी एक विद्यार्थी, एक झाड संकल्पना समजावून सांगितली आणि येत्या पावसाळ्यात वृक्षलागवडीचे आवाहन केले. यंदाच्या वने व अन्न या संकल्पनेवरही त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सहायक वनसंरक्षक भरत खेळबाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने, संध्या बगडे यांच्यासह एस. पी. डोईफोडे, टी. ए. देवकते, बालाजी एस. भुरके, सुनील खामकर, बाळासाहेब तिडके, शिक्षकवृंद, वन्यजीव रक्षक तसिफ खान आणि पैनगंगा अभयारण्यातील टीम तसेच वनमजूर रसूल शेख, रामराव राठोड, अंकुश राठोड, वेदचार्य राठोड यांनी मोलाचे योगदान दिले. सहलीच्या समारोपात विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले.

व्यापक सहभाग आणि प्रभावी संदेश दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमांना वनविभागातील कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. जागतिक वन दिनानिमित्त आयोजित या विविध उपक्रमांनी पर्यावरण संरक्षण आणि वनसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

बीडमध्ये रंगणार राज्यस्तरीय औद्योगिक प्रदर्शन आणि भव्य लघुउद्योग महोत्सव

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

सदगुरू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित राज्यस्तरीय औद्योगिक प्रदर्शन आणि भव्य लघुउद्योग महोत्सव बीडमध्ये उत्साहात पार पडणार आहे. हा भव्य महोत्सव दि.२७ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत बीड शहरातील रिलायन्स पेट्रोल पंपाच्या पाठीमागे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेत आयोजक सतीश बजगुडे, धर्मराज फाळके यांनी दिली.

या प्रदर्शनात लघुउद्योग, स्वयंरोजगार, नवीन तंत्रज्ञान, कृषी उद्योग, हस्तकला, महिला बचतगट उत्पादने, स्टार्टअप्स आणि विविध व्यावसायिक संधींचे सादरीकरण होणार आहे. यामुळे स्थानिक तसेच राज्यभरातील उद्योजक, व्यापारी, स्टार्टअप उद्योजक आणि इच्छुक व्यवसायिकांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख मान्यवर, प्रशासकीय अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. तसेच, नामांकित उद्योजकांचे मार्गदर्शन, विविध कार्यशाळा आणि यशस्वी उद्योजकांच्या प्रेरणादायी कथा यात समाविष्ट असतील.

या महोत्सवाचा लघुउद्योग आणि नवउद्योजकांना प्रेरणा देणारा उपक्रम म्हणून उल्लेख होत असून, सर्व नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराच्या वतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला हिंदू अणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, जयसिंग पंडित युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदु बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित असल्यामुळे शिवछत्र परिवाराच्या या इफ्तार पार्टीत हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्य पुन्हा एकदा दिसुन आले.

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबीय व शिवछत्र परिवाराच्या वतीने सालाबादाप्रमाणे मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन केले होते. रमजान महिण्याच्या निमित्ताने शनिवार दि. २२ मार्च रोजी सायं. ६ : ४२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नगर परिषद कॉम्प्लेक्स, गेवराई येथे भव्य इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजा ईप्तार पार्टिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, मुहम्मद गौस, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, मनोज हजारे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक तात्या आतकरे, तालुका उपाध्यक्ष दत्ताभाऊ दाभाडे, कांतासेठ नवपुते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, माजी नगरसेवक सय्यद नजीबभाई, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, एजाज अत्तार, मुहम्मद आवेज शरीफ, सय्यद शफी अत्तार, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, पत्रकार अयुब बागवान, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, तालुकाध्यक्ष अब्दुल खालेक कुरेशी, धोंडराई सर्कलचे युवानेते अजीम इनामदार, वसीम फारुकी, नवीद मशायक, शेख मोहसीन भाऊ, शेख मकसूद, बागवान समाजाचे अध्यक्ष माणिकसेठ बागवान, अब्दुल सत्तार कुरेशी, जानमोहम्मद बागवान, माजी नगरसेवक मंजूर बागवान, मोहसीन बागवान, शब्बू मशायक, काझी शौकत, गुफरान इनामदार, नईम बिल्डर, नईम बागवान, काझी शफिक काझी शकील यांच्यासह गेवराई शहर व तालुक्यातील रोजदार मुस्लिमबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

पालक सभेला मिळाला पालकांचा उत्तम प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी यांनी पालक हा शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील दुवा आहे. विद्यार्थी शाळेत काय शिकतो, त्याचे शाळेतील वर्तन कसे असते याची विचारपूस नियमित केली पाहिजे. अनेक पालकांनी आपले मनोगत मांडल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

विद्यासभा उपाध्यक्ष श्री. उमेश जगताप यांनी पालकांशी संवाद साधताना पालकांनी आपल्या पाल्याला घरातूनच उत्तम संस्कार दिले तसेच त्यांच्यासोबत मनमोकळे पणाने राहिले तर त्या पाल्याचे शालेय जीवन आनंदमय होईल. पालकांनी शिक्षकांवर व शालेय व्यवस्थापनावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

विषय मांडणी करताना मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे यांनी पालकांना विद्यार्थ्यांसाठी शाळा काय काय उपक्रम राबवते, आगामी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी केलेल्या नियोजनासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

यावेळी पालक मेळाव्याला पालकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

यावेळी माजी विद्यार्थी चि. हरिओम गरड याने शालेय वातावरणात मी कसा अभ्यास केला व विविध उपक्रमात सहभागी झाल्याबद्दलचे अनुभव कथन केले.

याप्रसंगी श्री. डी. एस. साक्रूडकर व सौ. शितल नागरगोजे या दोन पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेशजी जगताप, मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, उपमुख्याध्यापक श्री माधव जोशी, दहावी प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर, शिक्षक पालक प्रतिनिधी सौ. शितल नागरगोजे, श्री. डी.एस. साक्रुडकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सुजाता चिंचपूरकर यांनी केले तर सूत्रसंचालन सौ. सविता कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. स्मिता नरहरे यांनी तर वैयक्तिक पद्य मुकुंद मिरगे यांनी गायले.

विमलताई जगताप यांचे दुःखद निधन

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

पालसिंगण येथील प्रतिष्ठित नागरिक हरिश्चंद्र जगताप पाटील यांच्या सुविद्य पत्नी आणि श्री.छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे संचालक प्रा. शिवाजीराव जगताप पाटील यांच्या भावजयी व श्री.रंजित हरिश्चंद्र जगताप यांच्या मातोश्री विमलताई जगताप यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी येथे गुरुवारी दुपारी ११.५० वाजता दुःखद निधन झाले. अंत्यविधी पालसिंगण येथे सायं. ५.३० वाजता करण्यात आला.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ आणि धार्मिक होता. श्री. छत्रपती शाहू समाज प्रबोधन मंडळ बीडच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून मंजेरी हवेली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप!

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. अनिलदादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पाली सर्कलमधील जिल्हा परिषद शाळा (मंजेरी हवेली) येथील विद्यार्थ्यांना दि. २१ मार्च २०२५ रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने वह्या वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा पालकांच्या उपस्थितीमध्ये अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी या वह्या वाटप केल्या. जिल्हा परिषद शाळा मंजेरी हवेलीचे मुख्याध्यापक सय्यद सर आणि उपस्थित पालकांनी यांनी अनिलदादा जगताप फाउंडेशनचे आभार व्यक्त करत फाउंडेशनच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले आणि अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राजस्थानी विद्यालयात व्यवसायिक मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

बीड येथील राजस्थानी सेवा समाजव्दारा संचलित द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयात चित्रकला आर्टिस्ट कु. अर्यमा रविंद्र झंवर, पुणे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.कु. अर्यमा झंवर यांनी आपल्या जीवनातील अनुभवातून वेळ, वय, ध्येय ,मेहनत, सचोटी, निरीक्षण इ. सांगताना विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत अनेक प्रयोग केले पाहिजेत. अनेकविध क्षेत्रांचा अभ्यास सखोल करावा ते क्षेत्र जाणून घ्यावे असे प्रतिपादित केले.विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी श्री. कसबे आर. एस. यांनी कु.अर्यमा झंवर हिचे कौतुक करून तिच्या पुढील कार्यासाठी तिला शुभेच्छा दिल्या.

ह्यावेळी कार्यक्रमासाठी विद्यालयाचे उप मु.अ श्री.लाहोटी एस. के. पर्यवेक्षक श्री हावळे ए.ए व सर्व शिक्षक वृंद तसे शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री वाघमारे सारंग यांनी केले.

सूर्याच्यावाडीच्या लाल मातीने मर्दागी कुस्तीची परंपरा जोपासली– राजेंद्र मस्के

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

सूर्याचीवाडी ता.बीड येथे पिरबाबा दर्ग्याच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सूर्याचीवाडी येथील व परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते, या स्पर्धेमध्ये राज्यभरातून कुस्तीतील नामवंत पैलवान यांनी भाग घेतला होता, सूर्याचीवाडी हे गाव लोकसंख्येने कमी असले तरी महाराष्ट्रातील कुस्ती हा पारंपारिक व ग्रामीण खेळ जोपासण्याचे काम सूर्याची वाडी येथील ग्रामस्थांनी केले आहे,अतिशय उत्कृष्ट असे नियोजन व मोठ्या प्रमाणामध्ये कुस्तीतील भाग घेतलेल्या पैलवानांना बक्षीस देण्यात आले, कुस्ती हा खेळ लाल मातीत खेळला जातो ही लाल मातीतील कुस्तीची दंगल ग्रामीण भागातील नागरिकांना प्रेरणा देणारी असते, हा खेळ मर्दानी खेळ म्हणून या खेळाची ओळख आहे. एकास एक मल्य पैलवान हे आपले ताकदीच्या जीवावर व एकजुटीच्या जीवावर आपलं सर्वस्य पनाला लावून आपण या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस कसे पटकवतोल असे प्रयत्न करत असतात ,म्हणूनच लाल मातीतील या कुस्तीला मर्दानी खेळ असे ओळख निर्माण झाली आहे,असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आत्मनिर्भर भारतासाठी जल व्यवस्थापन काळाची गरज – डॉ.हनुमंत सौदागर

तभा वृत्तसेवा
केज दि.२३ मार्च

वर्तमान काळात पाणी, नाणी आणि वाणी याचा अत्यंत जपून वापर करणे आवश्यक आहे. कारण या तिन्हीच्याही अतिरिक्त वापरामुळे अनेक समस्या गंभीर निर्माण झाल्या असून भारताला आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी जल व्यवस्थापन करणे ही काळाची गरज व भविष्याची मागणी असण्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय व भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, केज यांच्या संयुक्त विद्यमाने भूगोल विभागाच्या वतीने आयोजित २२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किरणकुमार धिंमधिमे हे होते. यावेळी प्रा. राजश्री कचरे व प्रा. उषा बलाढ्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष समारोप प्रसंगी बोलताना डॉ. धिंमधिमे म्हणाले की, पाणी ही अत्यंत ज्वलंत समस्या असून सामाजिक स्वास्थ्यासाठी पाण्याची उपलब्धता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यासाठी लोक चळवळीच्या माध्यमातून जल व्यवस्थापनाचे काम करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाची सांगता जल प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अर्चना वाघमारे यांनी प्रास्ताविक डॉ. नागेश कराळे तर आभार विद्यार्थी अविनाश मुंडे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

पांडुरंग परमात्मा उदार अंतकरानाचा आहे

–ह.भ.प तुकाराम महाराज करडकर

तभा वृत्तसेवा
बीड दि.२३ मार्च

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवातील तिसऱ्या दिवशीच्या किर्तन सेवेचे पुष्प गुंफताना करडकर महाराजांनी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचा मागणी पर प्रकरणातील पुढील अभंग चिंतनास घेतला होता.

श्रश्र हेचि दान देगा देवा श्रश्र
श्रश्र तुझा विसर न व्हावा श्रश्र

अभंगावर भाष्य करताना महाराज म्हणाले की भगवंत हा उदार अंतकरणाचा आहे आपल्याला झेपेल मावेल एवढे दान तो देतो परंतु आपण आपल्या जीवनामध्ये सदवर्तन ठेवा ,भगवंताचे चिंतन करा, जगात भगवंताच्या भगवत भक्ती शिवाय दुसरे विचार मनात आणू नका या भगवंत भक्तीचे फळ म्हणून भगवंत आपल्या सर्व मनोकामना पूर्ण करतात पंढरपुरातील श्री रुक्मिणीवर पांडुरंग परमात्मा हा उदार अंतकरणाचा आहे असे अनमोल विचार आपल्या चिंतन रुपी सेवेमध्ये तुकाराम महाराज करडकर यांनी विशद केले.

भक्ती करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत परंतु सर्वश्रेष्ठ भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय असेही महाराजांनी सांगितले . आपल्या जीवनात इतर भक्ती करण्याच्या साधनेमध्ये आपणास काही अडथळे येऊ शकतात परंतु सर्वात सोपी भक्ती म्हणजे श्रवण भक्ती होय .आपण होईल तेवढे भगवंताचे नामस्मरण करा आणि आपल्या परिसरातील गावातील नाम सप्ताह ,किर्तन महोत्सव, भागवत ग्रंथ महापुराण आदी ठिकाणी आपली हजेरी लावून श्रवण भक्ती करा याचे फळ आपल्याला भगवंत दिल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास देखील तुकाराम महाराज करडकर आळंदी देवाची यांनी विशद केले. किर्तन सेवेनंतर कळेकर परिवाराच्यावतीने विनोद कळेकर यांनी महाराज मंडळी यांचा सन्मान करण्यात आला. या बीज उत्सवानिमित्त त्रि दिवशी कीर्तन महोत्सवाच्या सांगता प्रसंगी खरडेवाडी, धावज्याचीवाडी, पांढरवाडी, चाकरवाडी, आगेवाडी, परळी, बीड, वांगी आधी ठिकाणाहून महाराज मंडळी व गायक मंडळी उपस्थित होते.